१०३ शतकोत्तर वाटचाल
R.N.I.No.1814/57
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
• मुंबई, सोमवार १८ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-१६५, पाने-८, किंमत : ₹ ५ NAVAKAL
• Vol.- 103, Issue - 165, Marathi - Daily -Mumbai, 18 August, 2025 Page- 8 Price- Rs. 5/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

# राहुल गांधींना उत्तर! आयोगाची पत्रकार परिषद
## मात्र संशय बळावला! नेते-मतदारांनाच जबाबदार धरले



**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सतत मतचोरीचा आरोप केल्याने निवडणूक आयोगाने आज अखेर या आरोपांना उत्तर देण्यासाठी पत्रकार परिषद घेतली. मात्र या पत्रकार परिषदेमुळे मतदार यादी बिनचूक नाही हा संशय अधिकच वाढला. याचे कारण दुबार मतदान, अनेकवेळा तीच नावे, घर क्रमांक शून्य या बाबी असल्या तरी सखोल तपास होत नाही तोपर्यंत आम्ही ही नावे काढणार नाही. मतदारांनी, आमदारांनी अधिकृत फॉर्म भरून तक्रार केल्यावरच पडताळणी होईल. मतदाराची माहिती हवी असेल तर त्याला दिलेला एपिक नंबर टाकून तुम्ही माहिती घ्या, असे निवडणूक आयोगाने म्हटले. त्यांच्या या वक्तव्याने आयोग स्वत: नाव नोंदणी करताना काळजी घेत नाही हे स्पष्ट झाले. महाराष्ट्रात ४० लाख मतदार कसे वाढले? किंवा शेवटच्या तासात एकदम मतदान का झाले? यावर त्यांच्याकडे ठोस उत्तर नव्हते. गेली २० वर्षे मतदार यादीची सखोल तपासणी (एसआयआर ) का झाली नाही, याचेही उत्तर ते देऊ शकले नाहीत.**

■ नवी दिल्ली

**दीड** तास चाललेल्या या पत्रकार परिषदेला मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि डॉ. सुखबिंदर सिंग सिंधू आणि डॉ. विवेक जोशी हे दोन आयुक्त उपस्थित होते. ज्ञानेश कुमार म्हणाले की, गेल्या दोन दशकांपासून म्हणजे गेली २० वर्षे याद्यांमधील त्रुटी दूर करण्याची एसआयआर प्रक्रिया राबवण्यात आली नाही. त्यामुळे आता निवडणूक पूर्वी ती राबवण्याची गरज होती. त्यामुळे बिहारपासून आम्ही सुरुवात केली. मतचोरीसारख्या चुकीच्या शब्दाचा वापर केला जात आहे. पण जनतेला भ्रमित करण्याचा हा अयशस्वी प्रयत्न आहे. हा भारतीय संविधानाचा अपमान आहे. संविधानानुसार निवडणूक ही आयोगाची जबाबदारी आहे. परंतु आयोग हा फक्त ८०० लोकांचा गट आहे. यात अनेक जिल्हाधिकारी, निवडणूक अधिकारी आणि पक्षांचा सहभाग आहे. प्रारूप मतदार यादी तयार झाल्यावर स्थानिक आमदार आणि मतदार ती यादी तपासून आक्षेप घेऊ शकतात. जो आमदार नाही तोही शपथपत्र देऊन आक्षेप घेऊ शकतो. या अर्जांची छाननी करून अंतिम यादी तयार होते. निवडणूक जाहीर झाल्यावर उमेदवारांना ही यादी दिली जाते. तेही आक्षेप नोंदवू शकतात. मतदानावेळी गैरमतदान होत आहे असे वाटले तर आक्षेप घेता येतो. मतमोजणी झाल्यानंतर ४५ दिवसांच्या आत न्यायालयात जाऊनही आक्षेप नोंदवता येतो. ही सर्व यंत्रणा असताना कोणत्याही पक्षाला मतदार यादीत आधी कोणतीही चूक

पान ७ वर

### राज्य आयोगाची मतदार यादी दुरुस्तीसाठी ८ दिवसांची मुदतवाढ

मुंबई - राज्य निवडणूक आयोगाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी सुरू केलेल्या विशेष मोहिमेला आठ दिवसांची मुदतवाढ दिली आहे.

या मोहिमेंतर्गत दुहेरी नोंदणी, चुकीचा पत्ता, चुकीचा फोटो, अपात्र मतदारांची नावे, मृत व्यक्तींची नावे यादीतून हटवणे अशा त्रुटींच्या दुरुस्तीवर भर दिला जाणार आहे. निवडणूक आयोगाने स्पष्ट केले की, या कालावधीत फॉर्म क्रमांक ६, ७, ८ द्वारे ऑनलाईन किंवा ऑफलाईन अर्ज करता येतील. राज्यभरात एकाचवेळी २६ जिल्हा परिषद, २९ महानगरपालिका व इतर स्थानिक संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. यासंदर्भात राजकीय पक्षांनाही आवाहन केले आहे की, त्यांच्या स्थानिक कार्यकर्त्यांमार्फत यादीतील त्रुटी शोधून दुरुस्तीची प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी.

# चिंचपोकळीच्या चिंतामणीचे भाविकांच्या प्रचंड गर्दीत आगमन



■ मुंबई

**मुंबईतील** लोकप्रिय सार्वजनिक गणपतींपैकी एक असलेल्या चिंचपोकळीच्या चिंतामणीचे आज मोठ्या उत्साहात आणि दिमाखात आगमन झाले. परळ वर्कशॉपमधून चिंतामणीची २२ फूट उंचीची भव्य मूर्ती आज मंडळाच्या मंडपात आणण्यात आली. यावेळी मुसळधार पाऊस पडत असूनही भाविकांनी मोठी गर्दी केली होती. गर्दीला आवरण्यासाठी पोलिसांनी विशेष बंदोबस्त ठेवला होता. मुंबईच्या गिरणगावातील चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाचे यंदा १०६ वे वर्षे आहे. १९२० साली या मंडळाची स्थापना झाली. आगमनाधीश बाप्पा म्हणून या मंडळाची ख्याती आहे. यावर्षीची मूर्ती छत्रपती संभाजी महाराजांच्या शैलीत सिंहासनावर विराजमान असलेली आहे. आगमनावेळी बाप्पाला लाल रंगाचे धोतर आणि लाल रंगाचा शेला परिधान करण्यात आला होता.

# राष्ट्रपती-राज्यपालांना कालमर्यादा देणे हा अधिकारात हस्तक्षेप!

### सरकारचा प्रतिज्ञापत्रातून कोर्टाला इशारा

■ नवी दिल्ली

**राज्य** विधानसभांनी मंजूर केलेल्या विधेयकांवर राज्यपाल आणि राष्ट्रपती यांनी कारवाई करण्यासाठी निश्चित कालमर्यादा ठरवणे म्हणजे राज्याच्या एका घटकाने संविधानाने न दिलेले अधिकार स्वतःकडे खेचणे आहे. त्यामुळे देशात घटनात्मक गोंधळ निर्माण होईल, प्रशासकीय यंत्रणेच्या अधिकारांत हस्तक्षेप ठरेल, असा इशारा केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिला आहे.



तामिळनाडू सरकारने मंजूर केलेली दहा विधेयके मंजूर न करता राज्यपालांनी ती अडवून ठेवल्याने सरकारने सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत. राज्य विधिमंडळांनी मंजूर केलेली विधेयके मंजुरीसाठी राज्यपाल अथवा राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आल्यास त्यांना मान्यता देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने ३ महिन्यांची मुदत घातली होती. या आदेशावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपतींसाठी न्यायालयांना असा कालावधी निश्चित करता येतो का, अशी विचारणा करून सर्वोच्च न्यायालयाला १४ प्रश्न विचारले होते. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडे राष्ट्रपतींच्या संदर्भाबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले होते.

कलम १४३ अंतर्गत राष्ट्रपतींनी

पान ७ वर

# महाराष्ट्राचे राज्यपाल राधाकृष्णन उपराष्ट्रपतीपदासाठीचे उमेदवार

■ नवी दिल्ली

**उपराष्ट्रपती पदाच्या** निवडणुकीसाठी एनडीएकडून महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. भाजपाचे अध्यक्ष जी. पी. नड्डा यांनी आज पत्रकार परिषद घेऊन त्यांच्या नावाची घोषणा केली. जगदीप धनखड यांनी २१ जुलै रोजी आपला कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिला होता.



१९५७ मध्ये तामिळनाडूतील तिरुप्पूर येथे जन्मलेले राधाकृष्णन यांनी बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनच्या पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात गेल्यावर १९७४ मध्ये जनसंघाच्या राज्य कार्यकारिणीत गेले. कोइम्बतूरमधून ते दोनदा लोकसभेवर निवडून गेले होते. २००४ ते २००७ या काळात ते तामिळनाडू भाजपाचे प्रदेशाध्यक्ष होते. ते काही काळ झारखंडचे आणि तेलंगणाचे राज्यपाल, पुद्दुचेरीचे नायब राज्यपालदेखील

पान २ वर

# अंतराळवीर शुभांशू दिल्लीत दाखल ढोल-ताशांच्या गजरात स्वागत

■ नवी दिल्ली

**ॲक्सियम** मिशन-४ अंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील मोहीम पूर्ण करून भारताचे अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला आज पहाटे मायदेशी परतले. दिल्ली विमानतळावर त्यांच्या स्वागतासाठी कुटुंबीय, केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. ढोल-ताशांच्या गजरात आणि 'भारत माता की जय'च्या घोषणांनी तसेच तिरंगा फडकवून त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

शुक्ला २३ ऑगस्ट रोजी



इस्त्रोच्या आंतरराष्ट्रीय अंतराळ दिनाच्या कार्यक्रमात सहभागी होणार असून, २५ ऑगस्ट रोजी ते लखनौतील घरी परतणार आहेत. त्यांच्या आईने आनंद व्यक्त करताना सांगितले, मी त्याच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहते आहे.

केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी हा क्षण भारतासाठी ऐतिहासिक आणि अभिमानाचा असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, हा क्षण केवळ भारतासाठीच नव्हे, तर इस्त्रोसाठीही गौरवाचा आहे.

# ग्रामीण बँक युनियनचे दिल्लीमध्ये १९ ऑगस्ट रोजी धरणे आंदोलन

■ मुंबई

**युनायटेड** फोरम ऑफ ग्रामीण बँक युनियनच्या वतीने येत्या १९ ऑगस्ट रोजी दिल्लीतील जंतरमंतर येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. ग्रामीण बँकाच्या खासगीकरणाविरोधात हे आंदोलन करण्यात येणार असल्याचे युनियनचे अध्यक्ष देविदास तुळजापूरकर यांनी म्हटले आहे.

ग्रामीण भागातील लहान व मध्यम शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागीर, उद्योजक यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी १९७५ साली प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना करण्यात आली होती. देशातील २७ राज्ये व केंद्रशासित भागातील एकूण २८ ग्रामीण बँका सध्या ७०० जिल्ह्यांमधून २२ हजार शाखांद्वारे सेवा देत आहेत. या बँकांचा व्यवहार १२ लाख कोटी रुपयांचा असून, बँकांनी तब्बल साडेआठ हजार कोटी रुपयांचा नफा मिळवला आहे. सध्याच्या सरकारने या ग्रामीण बँकांचे खासगीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या बँकांचा नफा खासगी कंपन्यांना मिळेल. काहीही करून केवळ नफाच मिळवायचा असे त्यांचे धोरण असल्याने त्याचा फटका ग्रामीण भागातील जनतेला बसणार आहे.

# यापुढे एकाही मताची चोरी होऊ देणार नाही

■ पाटणा

**आम्ही** संपूर्ण देशातून मतांची चोरी दूर करणार असून, यापुढे एकाही मताची चोरी होऊ देणार नाही, असे काँग्रेस खासदार व विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटले. आज बिहारच्या पूर्णिया जिल्ह्यातील सासाराम येथून त्यांच्या मतदार अधिकार यात्रेला सुरुवात झाली. यावेळी आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राजद नेते लालू यादव यांच्यासह काँग्रेस, राजद व इतर सहयोगी पक्षाचे नेते उपस्थित होते. राहुल गांधींच्या या सभेला पन्नास हजाराहून अधिक लोक उपस्थित होते.



राहुल गांधींची मतदार अधिकार यात्रा सुरू

राहुल गांधी म्हणाले की, या आधी निवडणूक आयोग कशाप्रकारे मतांची चोरी करत होते, हे लोकांच्या लक्षात येत नव्हते. आम्ही घेतलेल्या पत्रकार परिषदेतून हा सारा प्रकार समजावून सांगितला. बिहारमध्ये ते मतदारयाद्यांच्या पुनर्परिक्षणाच्या माध्यमातून मतांची चोरी करण्याचा प्रयत्न करत आहेत. यावेळी आम्ही त्यांचे प्रयत्न यशस्वी होऊ देणार नाही. पंतप्रधान मोदी योग्य रितीने जातीनिहाय जनगणना करतील, असे वाटत नाही. इंडिया आघाडीच योग्य पद्धतीने ही जनगणना करेल.

यावेळी राजद नेते लालू यादव, तेजस्वी यादवही उपस्थित होते. तेजस्वी म्हणाले की, संविधानाने देशातील गरीब व कमकुवत व्यक्तीलाही मतदानाचा हक्क दिला आहे. भाजपा मात्र निवडणूक आयोगाच्या मदतीने तो अधिकार हिरावून घेत आहे. राहुल गांधी यांनी बिहारमधून या यात्रेला सुरुवात केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. राहुल गांधी यांची मतदार अधिकार यात्रा १३०० किलोमीटरचा प्रवास करणार आहे. १ सप्टेंबर रोजी पाटण्यातच तिची सांगता होणार आहे.

# मुंबईतील कबुतरखान्यांबाबत हरकती व सूचनांचे आवाहन

■ मुंबई

**मुंबईतील** कबुतरखान्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून, उच्च न्यायालयाने याबाबत नागरिकांची मते जाणून घेण्याचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांना आपल्या हरकती व सूचना नोंदवण्याचे आवाहन केले आहे. उद्यापासून ही नोंदणी प्रक्रिया सुरू होत आहे.

महापालिकेने आपल्या पत्रकात म्हटले आहे की, मुंबईतील कबुतरखान्यांबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेला दादर कबुतरखाना ट्रस्ट बोर्ड, यास्मिन भन्साळी अँड कंपनी आणि श्रीमती पल्लवी पाटील, ॲनिमल अँड बर्ड्स राईटस् ॲक्टिविस्ट यांच्याकडून अर्ज प्राप्त झाले आहेत. हे अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous?guest_user-english या लिंकवर पाहता येणार असून नागरिकांनी संकेतस्थळावर दिलेल्या या अर्जांचे अवलोकन करावे. त्याचप्रमाणे कबुतरखान्यांच्या ठिकाणी नियंत्रित पद्धतीने व ठराविक वेळेतच

पान ७ वर

# पृथ्वीराज चव्हाणांच्या सहाय्यकांच्या कुटुंबियांची दुबार मतदारनोंदणी

■ सातारा

**लोकसभेतील** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देशभरात मतदार यादींमध्ये घोटाळे झाल्याचा आरोप केला असतानाच कराड येथे काँग्रेस नेते व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे स्वीय सहाय्यक गजानन आवळकर आणि त्यांच्या कुटुंबियांची नावे मतदार यादीत दोन ठिकाणी असल्याचा गंभीर आरोप भाजपाचे प्रवक्ते मोहन जाधव यांनी केला आहे.

मोहन जाधव म्हणाले की, वाठार व कराड या दोन्ही ठिकाणी आवळकर कुटुंबियांची नावे मतदार यादीत आहेत. वाठार केंद्रात गजानन शंकर आवळकर (६३), संगीता गजानन आवळकर

### भाजपाचा आरोप

(५६) आणि जयप्रकाश शंकर आवळकर (४९) अशी नावे आहेत. तर कराड शहरातील भाग क्रमांक १२७ मध्ये त्याच नावांची दुसऱ्यांदा नोंद झाली आहे. आवळकर यांनी पृथ्वीराज चव्हाण यांचा वरदहस्त आणि पदाचा वापर करून ही नोंदणी कायम ठेवली. या प्रकरणात बोगस आधारकार्ड अथवा अन्य कागदपत्रांचा वापर झाला का? कराड दक्षिण मतदारसंघात आणखी किती दुबार नोंदणी झाली आहे? यामागे चव्हाण यांची संमती होती का? विशेष म्हणजे, काँग्रेसकडून मतदार यादीतील बोगस मतदान पडताळणी समितीचे अध्यक्ष म्हणून पृथ्वीराज चव्हाण काम पाहत आहेत. त्यामुळे त्यांच्या निकटवर्तीयांकडूनच बोगस मतदानाचा प्रकार समोर आल्याने चर्चेला उधाण आले आहे.

# पंतप्रधान मोदींकडून दिल्लीमधील ११०० कोटींच्या प्रकल्पांचे लोकार्पण

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत ११०० कोटी रुपयांच्या दोन प्रकल्पांचे लोकार्पण केले. यावेळी त्यांनी रोड शोही केला. या कार्यक्रमाला रस्ते वाहतूक व महामार्ग विकास मंत्री नितीन गडकरीही उपस्थित होते.

पंतप्रधानांच्या हस्ते आज दिल्लीची वाहतूक सुरळीत करण्यासाठीच्या योजनेचा भाग म्हणून द्वारका एक्स्प्रेस-वे व शहराच्या जोडमार्ग क्रमांक-२ चे लोकार्पण करण्यात आले. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता व हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सैनी यावेळी उपस्थित होते. अर्बन एक्सटेंशन रोड क्रमांक-२ मुळे दिल्लीतून केवळ चाळीस मिनिटांत इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचता येणार आहे. याचा फायदा मुंडका, बक्करवाला, नजफगढ व द्वारका त्याचप्रमाणे महिपालपूर भागात वेगाने जाता येणार आहे. या मार्गामुळे मुकरबा चौक, मधुबन चौक, पीरागढी चौक व धौलाकुआं या भागातील वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे. द्वारका महामार्गाचा फायदा सोनीपत, बहादुरगढ येथील उद्योजकांनाही होणार आहे.

# गिरण्यांच्या जागी गगनचुंबी इमारती! मराठी माणूस गायब

### शरद पवारांचे वक्तव्य

■ पुणे

**मुंबईतील** गिरण्यांच्या जागी ४०-५० मजली गगनचुंबी इमारती उभ्या आहेत. परंतु मराठी माणूस कुठेच दिसत नाही, असे वक्तव्य शरद पवार यांनी केले. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई आणि मराठी या मुद्यावरून राजकीय वातावरण तापले असताना त्यांनी हे वक्तव्य केल्याने त्याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

पुण्यात आयोजित किशोर पवार यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमात शरद पवार उपस्थित होते. यावेळी ते म्हणाले की, आमच्या पिढीने कामगार चळवळीत अनेक प्रश्न सोडवले. कधी सरकार, तर कधी कामगारांबाबत मध्यस्थीची भूमिका घेतली. एकेकाळी मुंबईत तब्बल २०० गिरण्या होत्या. पण आज गिरण्या नाहीत, कामगार नाहीत. त्याजागी चाळीस-पन्नास मजली इमारती उभ्या राहिल्या आहेत. मात्र, त्या ठिकाणी मराठी माणूस कुठेच दिसत नाही.

ते पुढे म्हणाले की, ज्या वसंतदादांचे सरकार मी पाडले, त्याच वसंतदादांनी नंतर भूतकाळ विसरून गांधी-नेहरूंच्या विचारांसाठी मला मुख्यमंत्रिपदासाठी पाठिंबा दिला. ही त्याकाळच्या नेतृत्वाची मोठी वृत्ती होती. त्यावेळी वसंतदादा, रामराव आदिक, शिवाजीराव निलंगेकर अशा अनेक नेत्यांची मुख्यमंत्रिपदासाठी नावे चर्चेत होती. मात्र वसंतदादांनी स्पष्ट सांगितले की, आता कुणाच्याही नावाची चर्चा नको, नेतृत्व शरदकडे द्यावे.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा

८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

पेस्ट कंट्रोल कंपनी मुंबई, ठाणे, डोंबिवली करिता टेक्निशियन, टेली कॉलर, सेल्समन आणि लायसन्स ऑफिसर, ऑपरेटर पाहिजेत : **9323682041** आकर्षक वेतन. {NC251959}

अंधेरीमधील लॉजिस्टिक कंपनीला डिलीव्हरीबॉईज पाहिजेत.पगार 16000/- ते 20000/- वयोमर्यादा 18 ते 32 वर्षे शिक्षण-दहावी. अंधेरी जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य,संपर्क करा - **मॅक्स कुरीयर एन्ड कार्गो**,गाळा नं. 28, मखारिया इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, पेपर बॉक्सजवळ,अंधेरी (पुर्व) मुंबई-400093 फोन - **9320101188** {NC251971}

दादर पश्चिम येथे व्हेज रेस्टॉरंटमध्ये कचोरी, सामोसे, गुलाबजामुन, जिलेबी इत्यादि बनविण्यासाठी अनुभवी कारागीर पाहिजे. आकर्षक वेतन + रहाण्याची, जेवणाची सोय संपर्क - **9920554744** {NC251967}

हॉंगकॉंगमध्ये लहान मुलाला सांभाळण्यासाठी व जेवण बनवण्यासाठी बाई पाहिजे **9833432953** {NC251972}

मालवण येथे अनुभवी स्थानिक महिला स्वयंपाकी (लेडिज), रूमबॉय, आणि रिसेप्शनिस्ट पाहिजेत, संपर्क : **9423954861** {NC251981}

मालाड (वे.), ड्रायफ्रुटच्या दुकानामध्ये अनुभवी सेल्समेन आणि हेल्पर पाहिजेत. (राहण्याची/जेवण्याची सोय) गाला ड्रायफ्रुट, शॉप नं. ६, जया निवास, गोरसवाडी, तुंगा हॉस्पिटलच्या खाली मालाड (वे.) **9820202442 / 9833248464** {NC251983}

त्वरित पाहिजे आहे कंपनीसाठी हुशार अनुभवी, विश्वासू, तरुण-प्यून, सायकल चालवता येणे आवश्यक. पत्ताः ए टु झेड स्टिलॉइस प्रायव्हेट लिमिटेड, २९, मॅगझिन स्ट्रीट, संगम हॉटेलजवळ दारूखाना, रे रोड, मुंबई - ४०००१०. दुरध्वनी :- **7021734143** {NC251977}

## पाहिजेत

शिवडीमध्ये हेडलबर्ग SORMZ टूकलर प्रिंटिंग मशीनकरीता मेटपेट प्रिंटिंग, युवी वार्निश आणि ड्रीपोफचा अनुभव असलेले प्रिंटर, बॉयलर आणि फिडरमन पाहिजेत. त्वरीत संपर्क करा. **9082517355** {NC251931}

इमिटेशन ज्वेलरीसाठी मुली पाहिजे. **7023506405** {NC251922}

अंधेरी येथे सुरक्षारक्षक पाहिजेत. पगार 26219/- + अधिक सुविधा. **9224216144 / 9869576582** {NC251973}

HDFC बँक जॉबसाठी मुले-मुलींची डायरेक्ट भर्ती पगार: 17500-35000 संपर्क : **7758908779** {NC251939}

ताडदेव ऑफिससाठी कॉम्प्युटरचा अनुभव असलेले स्टाफ पाहिजेत. वय (20-35) वर्षे **9920053121** {NC251940}

अंधेरी येथे ऑफिसमध्ये पार्टटाईम हेल्पर पाहिजे. पगार 10000 फोन - **7977596442** {NC251921}

कल्याणमध्ये गव्हर्मेंट इलेक्ट्रीकल कंपनीकरिता सुपरवायझर, वायरमेन,हेल्पर व अकाऊंटट पाहिजेत **8080619999** {NC251945}

परळ/प्रभादेवी प्रतिष्ठित साईटवर सिक्युरिटी गार्ड, पगार २०,०००/- ₹, सुपरवायझर, पगार २३,०००/- ₹ त्वरित पाहिजेत. (१२ तास) आठवड्याची एक सुट्टी संपर्क : G9 सिक्युरिटी फोर्स 42/A, शिवसेना शाखेसमोर, बीडीडी चाळ, बावला मशीदजवळ, करीरोड, पश्चिम, मुंबई - 13. **8591979287 / 8591979288 / 8591979284** {NC251979}

डिलिव्हरी बॉय/गर्ल पार्ट/फुलटाईम DTDC कुरियर शॉप 1/2, शिंदे निवास, कार्टर रोड, नंबर 6, बोरिवली ईस्ट **9323766047 / 8451015519** {NC251988}

## पाहिजेत

लॅमिनेशन मशीन ऑपरेटर आणि डीटीपी ऑपरेटर पाहिजेत, संपर्क सिस्टम्स, 1, चुनावाला इंडस्ट्रियल इस्टेट, कोंडीविटा लेन, अंधेरी पुर्व, **9920982277 / 8591182277.** {NC251989}

## Situation Vacant

Required Part Time Office Assistant with Tally Dadar office. **9833224522** {NC251943}

REQ Female for our Godown at Rabale, Navi Mumbai. B.Sc. passed (with Chemistry) having Min Exp of 2yrs in the said Field. Residing from Badlapur to CSMT & Digha to Panvel pref. Walk-in: Matangi, Thane (W) - Mob. **7400181025**, Email: sales@matangioffice.com {NC251917}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC251851}

## व्यवसायविषयक

छोटी इन्व्हेस्टमेंट आणि प्रत्येक महिना फिक्स इन्कम मिळवा, कायदेशीर व्यवहार, संपर्क साधा :- **8452810618** {NC251968}

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा- दादर- **8652643434 / 9967437950** {NC251966}

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- **मॅनेजर, 'नवाकाळ'**


# मतदार पडताळणी वादाच्या भोवऱ्यात

**देशातील प्रमुख राजकीय पक्षांचे लक्ष नोव्हेंबरमधे होणाऱ्या बिहारमधील विधानसभा निवडणुकीकडे आहे. बिहारमधे विधानसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडी आणि एनडीएची जुळवाजुळव चालू असतानाच मतदारयाद्यांच्या पडताळीवरून वादंग सुरु झाला. निवडणूक तीन-चार महिन्यांत अपेक्षित असताना निवडणूक आयोगाने कठोर निकष लावून मतदार याद्या पडताळणीचे काम सुरु केले आणि महिन्याभरातच ६५ लाखांहून अधिक मतदारांची नावे वगळण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. समाधानकारक पुरावे सादर करता आले नाहीत तर मतदार यादीतून नाव बाद केले जाईल, असा कडक शिस्तीचा बडगा निवडणूक आयोगाने मतदारांवर उगारला आहे. बिहारच्या मतदार यादीतून ९४ लाख ते एक कोटी नावे बाद होऊ शकतात, असा अंदाज राजदचे नेते व बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी व्यक्त केला आहे.**

मतदार यादी पडताळणीबाबत असंतोष वाढू लागताच राजदचे खासदार मनोज झा, तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोइत्रा आदी अकरा जणांनी थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. याचिकाकर्त्यांच्यावतीने गेले महिन्याभर गोपाल शंकर नारायण, कपिल सिब्बल, अभिषेक मनु सिंघवी आदी दिग्गज कायदेपंडित सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडत आहेत आणि निवडणूक आयोगाच्यावतीनेही माजी ॲटर्नी जनरल के. के. वेणुगोपाल, राकेश व्दिवेदी, मनिंदर सिंग हे किल्ला लढवत आहेत. बिहार विधानसभेची निवडणूक तोंडावर आली असताना मतदार याद्या पडताळीचे भूत अचानक कसे उभे राहिले? मतदारयाद्यांची पडताळणी किंवा छाननी करायला कोणाचाच विरोध असायचे कारण नाही. पण आम्ही सांगू तेच दस्तऐवज सादर केले तरच तुमचे नाव मतदार यादीत राहील अशी दहशत निवडणूक आयोगाने लोकांमधे निर्माण केली आहे. त्या विरोधातच विरोधी पक्षांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत.

गेल्यावर्षी २०२४ मधे झालेल्या लोकसभा निवडणुकीत मतांची चोरी करून भाजपाने केंद्रातील सत्ता मिळवली आणि नंतर महाराष्ट्र व हरियाणामधे विधानसभा निवडणुकीत मतांची चोरी करून त्या राज्यांची सत्ता काबीज केली, असा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांनी दिल्लीत पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन करून निवडणूक आयोगावर केला. गेले सहा महिने अभ्यास करून, पुरावे गोळा करून आणि त्याचे विश्लेषण करून संख्यात्मक आकडेवारीही राहुल यांनी सादर केली. तब्बल सात फूट उंचीएवढी कागदपत्रे भक्कम पुरावे म्हणून सादर केले. तेव्हापासून व्होट चोरी हा शब्द देशभर रूढ झाला व मतांवर दरोडा टाकून केंद्रात व राज्यात भाजपाने सत्ता काबीज केली असा काँग्रेसने आरोप केला. केंद्रात तसेच महाराष्ट्रात व हरियाणात आलेली भाजपाची सरकारे मतांची चोरी करून सत्तेवर आली आहेत हे काँग्रेसने देशातील जनतेच्या मनावर बिबविण्याचा प्रयत्न चालू ठेवला आहे. महाराष्ट्र व हरियाणानंतर बिहारमधेही भाजपाला अशाच पध्दतीने सत्ता काबीज करायची असल्याने मतदार याद्या पडताळणीच्या नावावर लाखो नावे वगळण्यात येत आहेत, असा युक्तिवाद काँग्रेस व विरोधी पक्ष करीत आहेत. म्हणूनच सर्वोच्च न्यायालय काय आदेश देणार याकडे सर्व देशाचे लक्ष लागून राहिले आहे.

निवडणूक आयोगाने बिहारमधे ६५ लाख नावे वगळली आहेत, ती कारणांसह वेबसाईटवर टाकावीत, असे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. जर बावीस लाख मतदार मृत असतील तर त्यांची नावे तालुका किंवा उपविभागीय पातळीवर का जाहीर केली नाहीत? मृतांची, स्थलांतरीतांची व डुप्लिकेट नावे वेबसाईटवर जाहीर करण्याचे आदेशही न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले आहेत. मतदारयाद्या पडताळणी करताना पादर्शकतेसाठी कोणती पावले उचलली आहेत ते सांगा, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

बिहारमधील पूर्वी चंपारण, सीतामढी, मधुबनी, पूर्णिया, दरभंगा, मुजफ्फरपूर, गोपालगंज, सीवान, सारण, वैशाली, समस्तिपूर, भागलपूर, पाटणा, गया या जिल्ह्यात प्रत्येकी अडीच ते साडेतीन लाख मतदारांची नावे वगळली गेली आहेत. म्हणूनच मतदारयाद्या पडताळणीच्या विरोधात असंतोष प्रकटला आहे. वगळण्यात आलेल्या नावांमधे २२ लाख ३४ हजार मृत आहेत आणि ३६ लाख ३८ हजार हे कायमस्वरूपी स्थलांतरीत आहेत, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. सप्टेंबर अखेरीस जेव्हा अंतिम यादी जाहीर होईल तेव्हा वगळलेल्या नावांची संख्या एक कोटीच्या घरात पोहोचू शकते.

बिहारमधे राजद, काँग्रेस, सीपीआयएमएल, सीपीआय आदी विरोधी पक्षांचे हजारो निवडणूक एजंट आहेत, पण त्यांनी मतदार यादी पडताळणीबाबत निवडणूक आयोगाकडे एकदाही आक्षेप घेतला नाही असा युक्तिवाद आयोगाच्यावतीने न्यायालयात करण्यात आला. स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन म्हणजेच मतदारयाद्या पडताळणी यापूर्वी जेव्हा झाली तेव्हा निवडणुकीच्या अगोदर एक ते दोन वर्षे केली जात होती. मग यावेळी निवडणुकीच्या अगोदर जेमतेम चार महिने पडताळणीची टूम अचानक कशी निघाली? आयोगाने मतदारांकडे ज्या अकरा कागदपत्रांची मागणी केली आहे, पैकी अनेकांकडे एकही कागद मिळत नाही. प्रत्येक निवडणुकीत रोजगार, महागाई व भ्रष्टाचार हे मुद्दे चर्चेला असतात. यावेळी मात्र मतदारयादी पडताळणी याभोवतीच बिहारची निवडणूक केंद्रीत झाली आहे. केवळ आधार कार्ड असून उपयोगी नाही तर स्वत:चा जन्म दाखला, आईवडिलांचाही जन्म दाखला मागितला जातो आहे. सन २०२२ मधे बिहारमधे जातीगणना झाली. १४ टक्के दहावी उत्तीर्ण आहेत. ६० टक्के लोकांकडे पक्की घरे नाहीत. लाखो बिहारी अन्य राज्यांत रोजगारासाठी बाहेर आहेत. जागृकता व माहितीचा अभाव आहे. त्यांच्याकडे पुरावे म्हणून कागदपत्रे नाहीत. बिहारमधे आठ कोटी मतदार आहेत. पैकी २५ टक्के लोकांकडेतरी आवश्यक ती कागदपत्रे नाहीत. देशात आयएएस व आयपीएसमधे बिहारची मक्तेदारी आहे. पण बहुसंख्य आम जनता अशिक्षित, बेरोजगार आहे. मतदार यादीत नाव नसेल तर मतदान करता येणार नाही आणि निवडणूकही लढवता येणार नाही. झारखंडमधे पुरावा म्हणून आधारकार्ड चालते, पण बिहारमधे नाही. शेवटी सर्वोच्च न्यायालयाला आधारकार्ड स्वीकारा, असे आयोगाला सांगावे लागले.

बिहारची लोकसंख्या १४ कोटी आहे. पण जन्मदाखले किती जणांकडे आहेत? निवडणूक आयोगाने वगळलेल्या मतदारांमधे ३१ लाख महिला आहे. लग्न झालेल्या महिलांकडे आणि परप्रांतात रोजगारासाठी गेलेल्या मजुरांकडे बिहारचे निवासी म्हणून समाधानकारक पुरावे नाहीत. दोन कोटी बिहारी देशात विखुरलेले आहेत, त्यांनी कागदपत्रे काही जपून ठेवलेली नाहीत. मतचोरीच्या आरोपांपासून बिहारमधील मतदारयाद्या पडताळणीपर्यंत निवडणूक आयोगाच्या कारभाराला विरोधी पक्षांनी घेरले आहे.




- डॉ. सुकृत खांडेकर

# आजचे राशी भविष्य

सोमवार दि. १८ ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | कार्यक्षेत्रात अनुकूल परिस्थिती राहील. आर्थिक आवक चांगली राहील. भावंडांच्या गाठीभेटी होतील. |
| वृषभ | वडिलोपार्जित संपत्तीची कामे मार्गी लागतील. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. नोकरीच्या प्रयत्नांना यश मिळेल. |
| मिथुन | मनात सकारात्मक विचार राहतील. विवाहोत्सुक व्यक्तींसाठी अनुकूल काळ राहील. गुरुजनांचा आशीर्वाद लाभेल. |
| कर्क | व्यवसायामध्ये नवीन गुंतवणूक करण्याचे मनात येईल. मित्रमंडळींकडून भेटवस्तू मिळतील. एखाद्या धार्मिक स्थळी भेट देण्याचा योग येईल. |
| सिंह | ठरवलेल्या कार्यामध्ये यश येईल. नवीन ओळखीचा फायदा होईल. मित्रमंडळींची भेट होईल. व्यवसायानिमित्त प्रवास घडेल. |
| कन्या | व्यवसायामध्ये तुमच्या परिश्रमाचे चीज होईल. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. नोकरीच्या प्रयत्नांना यश मिळेल. |
| तूळ | सामाजिक क्षेत्रात नावलौकिक मिळवाल. व्यवसायामध्ये आर्थिक लाभ चांगले होतील. नोकरीमध्ये अधिक परिश्रम घ्यावे लागतील. |
| वृश्चिक | नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. काहींना अचानक धनलाभाचे योग येतील. वाहनाच्या वेगावर नियंत्रण ठेवणे आवश्यक. |
| धनु | कार्यक्षेत्रात अनेक अडचणींवर मात करण्यात यश मिळेल. घरातील वडिलधाऱ्यांच्या आरोग्याची काळजी वाटेल. |
| मकर | नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी राखण्यात यश मिळेल. प्रेमविवाहास उत्सुक मंडळींना अनुकूल काळ. प्रवासात काळजी घ्यावी. |
| कुंभ | व्यवसायामध्ये आर्थिक उलाढाल करताना सावधगिरी बाळगणे आवश्यक राहील. मुलांच्या यशाच्या वार्ता समजतील. |
| मीन | नोकरीमध्ये तुमचे वर्चस्व राहील. घरामध्ये धार्मिक कार्याचे आयोजन कराल. तरुण मंडळींना प्रेमात पूरक प्रतिसाद मिळेल. |

# क्रीडा खातेच बरे होते ! कृषिमंत्र्यांचे वक्तव्य

■ पुणे

**नुकतेच** कृषिमंत्री झालेले दत्तात्रय भरणे यांच्या एका वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. ते म्हणाले की, क्रीडा व अल्पसंख्याक खाते बरे होते, जास्त त्रास नव्हता, पण आता त्रास घ्यावाच लागेल. त्यांच्या या वक्तव्यानंतर त्यांना कृषिमंत्रिपदाचा त्रास होतो का? त्यांना या पदाचा भार पेलवत नाही का? अशा प्रकारच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

इंदापूर तालुक्यातील दगडवाडी येथे निरा नदीकाठी पूर संरक्षण भिंतीच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी भाषण करताना भरणे म्हणाले की, परवा मी विदर्भात होतो, काल मराठवाड्यात होतो. त्यामुळे खूप फिरावे लागत आहे. क्रीडा खाते असताना जास्त त्रास नव्हता. मात्र आपल्या वक्तव्यानंतर लगेचच त्यांनी सारवासारव करत हा त्रास नसून जबाबदारी आहे. आपल्या नेत्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला आहे, असे स्पष्ट केले. कोकाटे यांच्याकडून कृषी खाते काढून ते त्यांना देण्यात आले आहे.

# महाराष्ट्राचे राज्यपाल राधाकृष्णन उपराष्ट्रपतीपदासाठीचे उमेदवार

पान १ वरून

होते. ३१ जुलै २०२४ पासून ते महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत.

राधाकृष्णन २१ ऑगस्ट रोजी आपला उमेदवारी अर्ज भरतील. यावेळी एनडीएशासित राज्यांचे सर्व मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रीदेखील उपस्थित असतील. उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी ९ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे. त्याच दिवशी मतमोजणीही होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख २१ ऑगस्ट आहे. २५ ऑगस्टपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल.

# ज्येष्ठांना २ हजारांची पेन्शन देणार सभेत प्रशांत किशोर यांचे आश्वासन

■ हसनपूर

**आगामी** बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जन सूराज पक्षाचे अध्यक्ष प्रशांत किशोर यांची बिहार बदलाव यात्रा सुरू आहे. या यात्रेनिमित्त समस्तीपूरच्या हसनपूर विधानसभा मतदारसंघातील बिठान येथील गांधी मैदानात त्यांनी जाहीर सभा घेतली. त्यात त्यांनी बिहारमधील ज्येष्ठ नागरिकांना २ हजार रुपयांची पेन्शन देणार असल्याचे आश्वासन दिले. प्रशांत किशोर म्हणाले की, लालूजींचा मुलगा नववी पासही नाही. मात्र त्याला सत्ता हवी आहे, तर बिहारमधील सुशिक्षित मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. जर जनसुराज व्यवस्थेचे सरकार स्थापन झाले तर बिहारमधील तरुणांना कामासाठी बाहेरील राज्यांमध्ये जावे लागणार नाही आणि त्यांना बिहारमध्येच १०-१२ हजार रुपयांचा रोजगार मिळेल. डिसेंबर २०२५ पासून ६० वर्षांवरील पुरुष आणि महिलांना मासिक २००० रुपये पेन्शन दिली जाईल. सरकारी शाळांमध्ये सुधारणा होईपर्यंत आणि १५ वर्षांखालील मुलांना खाजगी शाळांमध्ये फी भरण्याची जबाबदारी सरकार घेईल, जेणेकरून गरीब मुलेही इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेऊ शकतील.

# राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा शशिकांत शिंदे यांची मागणी

■ मुंबई

**राज्यातील** मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, राज्य सरकारने पंचनामे न करता तातडीने मदत द्यावी आणि राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केली आहे.

शशिकांत शिंदे म्हणाले की, मे महिन्यापासून राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने थैमान घातले आहे. विदर्भ, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र या भागात मोठ्या प्रमाणात पावसामुळे बळीराजाचे नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांचे खरीप हंगामातील पिकाचे प्रचंड मोठे नुकसान झालेले आहे. त्यामुळे बळीराजा दुखावलेला आहे. विधिमंडळात राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या पंचनाम्याचा कुठलाही निर्णय घेतलेला नाही. बळीराजांच्या संदर्भात महायुतीचे सरकार गंभीर नसल्याचे दिसून येत आहे. राज्य सरकारकडे पैसे नाहीत. त्यामुळे सरकार आता शेतकऱ्यांना मदत करण्याची भूमिका घेत नाही.

# रात गयी बात गयी विधानाने मंत्री कोकाटे पुन्हा चर्चेत

■ जळगाव

**वादग्रस्त** वक्तव्य आणि विधिमंडळातील रमी खेळ प्रकरणामुळे चर्चेत असलेले क्रीडामंत्री माणिक कोकाटे 'रात गयी बात गयी' या विधानाने पुन्हा चर्चेचा विषय ठरले आहेत. ते आज जळगाव दौऱ्यावर होते. यावेळी वादग्रस्त विधानांबाबत माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. क्रीडामंत्री माणिक कोकाटे म्हणाले की, 'रात गयी बात गयी', मी नव्या इनिंगसाठी सज्ज आहे. एकदम जोरदार इनिंग असेल. तुम्ही काळजी करू नका. प्रत्येक गोष्टीत मागचे उकरून काढण्यात अर्थ नाही. पुढे चला, पुढे काही विषय असतील त्याच्यावर चर्चा करा. पुढे लोकांना कसा न्याय देता येईल त्यावर विचार केला पाहिजे. मागे खोलात जाण्याची आवश्यकता नाही.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 33 • तिकीट कि. रु. 20/- • सोडत दिनांक 17/08/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- : GL-01 : 7638

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 2349 | 2591 | 3883 | 4963 | 5091 | 5291 | 5363 | 6087 | 7488 | 7556 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0299 | 0825 | 3510 | 3562 | 3921 | 4336 | 5087 | 7573 | 8372 | 9375 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0484 | 0901 | 1048 | 3770 | 5304 | 5400 | 5972 | 6595 | 7835 | 8830 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0983 | 2021 | 3096 | 3842 | 4848 | 5525 | 6618 | 7328 | 8188 | 9006 |
| 0031 | 1131 | 2074 | 3143 | 3873 | 4888 | 5564 | 6620 | 7387 | 8260 | 9025 |
| 0080 | 1137 | 2221 | 3206 | 4004 | 4910 | 5568 | 6630 | 7477 | 8288 | 9039 |
| 0086 | 1203 | 2224 | 3234 | 4049 | 4949 | 5610 | 6683 | 7565 | 8289 | 9086 |
| 0148 | 1208 | 2269 | 3326 | 4120 | 5032 | 5659 | 6685 | 7657 | 8362 | 9147 |
| 0238 | 1211 | 2346 | 3339 | 4122 | 5049 | 5692 | 6692 | 7664 | 8407 | 9395 |
| 0308 | 1219 | 2450 | 3364 | 4144 | 5055 | 5816 | 6734 | 7708 | 8408 | 9399 |
| 0340 | 1233 | 2511 | 3374 | 4164 | 5084 | 5855 | 6766 | 7719 | 8483 | 9453 |
| 0390 | 1237 | 2722 | 3392 | 4248 | 5144 | 5899 | 6790 | 7762 | 8564 | 9457 |
| 0425 | 1264 | 2781 | 3394 | 4252 | 5145 | 5905 | 6873 | 7776 | 8717 | 9495 |
| 0430 | 1336 | 2800 | 3398 | 4291 | 5152 | 5956 | 6908 | 7778 | 8784 | 9639 |
| 0502 | 1439 | 2848 | 3423 | 4305 | 5155 | 5975 | 6960 | 7781 | 8802 | 9646 |
| 0586 | 1441 | 2926 | 3453 | 4344 | 5160 | 6034 | 6996 | 7827 | 8803 | 9697 |
| 0600 | 1445 | 2928 | 3466 | 4349 | 5169 | 6038 | 7000 | 7847 | 8805 | 9702 |
| 0673 | 1448 | 2929 | 3525 | 4419 | 5296 | 6051 | 7011 | 7884 | 8848 | 9717 |
| 0683 | 1511 | 2978 | 3623 | 4447 | 5333 | 6093 | 7015 | 7892 | 8868 | 9789 |
| 0704 | 1541 | 3007 | 3632 | 4455 | 5347 | 6243 | 7023 | 7917 | 8875 | 9840 |
| 0812 | 1710 | 3031 | 3720 | 4464 | 5351 | 6260 | 7223 | 7955 | 8886 | 9880 |
| 0841 | 1741 | 3037 | 3733 | 4494 | 5352 | 6269 | 7227 | 7977 | 8899 | 9902 |
| 0869 | 1831 | 3080 | 3748 | 4536 | 5416 | 6297 | 7254 | 8030 | 8973 | 9991 |
| 0892 | 1860 | 3093 | 3827 | 4827 | 5453 | 6608 | 7267 | 8048 | 8975 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. १८/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| ८ | ४ | ९ |
| ८० | ४१ | ९१ |
| ८५ | ४६ | ९६ |
| १८९ | १३० | १८० |
| ३५० | २४८ | ४७८ |

## निकाल — गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 33 • तिकीट कि. रु. 10/- • सोडत दिनांक 17/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : MG-03 : 1563 — किशोर लॉटरी सेंटर, सांगली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0534 | 1775 | 4947 | 6168 | 7339 |

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0273 | 0917 | 2715 | 3654 | 4539 | 5114 | 5298 | 6502 | 8321 | 9381 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1622 | 2513 | 2717 | 2952 | 4365 | 4869 | 4901 | 7664 | 8881 | 9482 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0004 | 0918 | 1827 | 3300 | 4301 | 5372 | 6161 | 6966 | 7977 | 9099 |
| 0052 | 0972 | 1830 | 3327 | 4319 | 5464 | 6266 | 7018 | 8187 | 9138 |
| 0080 | 1034 | 2124 | 3328 | 4415 | 5496 | 6342 | 7081 | 8382 | 9251 |
| 0096 | 1102 | 2130 | 3333 | 4542 | 5505 | 6426 | 7287 | 8426 | 9299 |
| 0150 | 1162 | 2230 | 3355 | 4671 | 5557 | 6453 | 7347 | 8428 | 9370 |
| 0182 | 1169 | 2251 | 3358 | 4684 | 5592 | 6467 | 7357 | 8660 | 9389 |
| 0309 | 1171 | 2272 | 3402 | 4699 | 5753 | 6469 | 7477 | 8709 | 9541 |
| 0570 | 1175 | 2505 | 3404 | 4916 | 5851 | 6486 | 7485 | 8762 | 9556 |
| 0707 | 1197 | 2626 | 3690 | 4954 | 5855 | 6556 | 7622 | 8869 | 9581 |
| 0770 | 1229 | 2887 | 3773 | 5067 | 5954 | 6607 | 7678 | 8881 | 9620 |
| 0779 | 1279 | 3075 | 3862 | 5092 | 6059 | 6663 | 7717 | 8891 | 9790 |
| 0797 | 1283 | 3173 | 3990 | 5132 | 6109 | 6670 | 7726 | 8962 | 9909 |
| 0903 | 1519 | 3230 | 4096 | 5149 | 6127 | 6695 | 7752 | 8984 | 9952 |
| 0911 | 1751 | 3296 | 4164 | 5303 | 6142 | 6947 | 7799 | 9084 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 33 • तिकीट कि. रु. 15/- • सोडत दिनांक 17/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : MO-05 : 3888 — रुखमणी एन्टरप्रायझेस, औरंगाबाद

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 1236 | 2414 | 2766 | 3527 | 3754 | 4069 | 4329 | 4637 | 4679 | 5740 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 1222 | 1310 | 2082 | 2342 | 2649 | 2898 | 3675 | 4243 | 4869 | 4887 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1198 | 1942 | 2380 | 3790 | 4843 |
| 1261 | 1981 | 2472 | 3827 | 5002 |
| 1351 | 1988 | 2522 | 3833 | 5006 |
| 1388 | 2027 | 2610 | 3838 | 5093 |
| 1401 | 2167 | 2876 | 4094 | 5131 |
| 1451 | 2206 | 2896 | 4351 | 5220 |
| 1514 | 2219 | 2997 | 4482 | 5315 |
| 1581 | 2240 | 3335 | 4499 | 5411 |
| 1615 | 2241 | 3337 | 4660 | 5531 |
| 1855 | 2242 | 3472 | 4694 | 5597 |
| 1888 | 2289 | 3603 | 4744 | 5990 |
| 1917 | 2367 | 3732 | 4754 | 5995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी





परळ-लालबागमध्ये अनेक गणेशोत्सव मंडळांनी ढोल-ताशांच्या गजरात लाडक्या बाप्पाची मूर्ती मंडपास्थळी नेली.

# तबब्ल ३५ फूट उंच असलेल्या साकीनाक्याच्या विघ्नहर्त्याचे आगमन

■ मुंबई

**चांदिवलीमधील** श्रीकृष्ण मित्र सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या साकीनाक्याच्या विघ्नहर्त्याचे मोठ्या थाटात आगमन झाले. विघ्नहर्त्याची मूर्ती ३५ फूट उंच आहे. या आगमन सोहळ्यात नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. आगमनाची सुरुवात उमा महेश्वर मंदिरापासून झाली. गणेश भक्तांनी विघ्नहर्त्याचा जयघोष करत ही भव्य मूर्ती मंडपास्थळी नेली.

यावेळी मुंबई उपनगर माजी पालकमंत्री मोहम्मद आरिफ नसीम खान, माजी खासदार पूनम महाजन, माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगले, शिवसेना विभाग प्रमुख सोमनाथ सांगळे, साकीनाका डिव्हिजन सहायक पोलीस आयुक्त प्रदिप मैराळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील यादव, मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत माने, वजीर चांद मुल्ला, बाबू बत्तेली, ॲड. कैलास आगवने, राम साहू, सुरेंद्र सिंह, निशात खान, हमीद पठाण, रियाझ मुल्ला, अजीज खान, रत्नाकर शेट्टी, डेरिन कोटीयन, मोहसीन शेख उपस्थित होते.



# पुणे जेएम रोड बॉम्बस्फोट प्रकरण! १३ वर्षांनंतरही आरोपीला जामीन नाही

■ मुंबई

**पुण्यातील** जेएम रोडवर २०१२ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी असद खानचा जामीन अर्ज मुंबई सत्र न्यायालयातील विशेष न्यायालयाने फेटाळला आहे. खानने १३ वर्षांचा तुरुंगवास भोगला असला तरी गुन्ह्याचे स्वरूप गंभीर असल्याने त्याला जामिनावर सोडता येणार नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

विशेष न्यायाधीश शायना पाटील यांनी दिलेल्या आदेशात म्हटले आहे की, खटला सुरू असून, आरोपीची सक्रिय भूमिका, सरकारी पक्षाने गोळा केलेले पुरावे आणि गुन्ह्याचे गांभीर्य यांचा विचार करणे आवश्यक आहे. तुरुंगातील दीर्घकाळ हा जामिनासाठीचा एकमेव आधार असू शकत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

१ ऑगस्ट २०१२ रोजी पुण्यातील जेएम रोडवर कमी तीव्रतेचे पाच बॉम्बस्फोट झाले होते. त्यात एका व्यक्तीला दुखापत झाली होती. या प्रकरणात खानसह नऊ जणांना अटक झाली होती. आरोप निश्चित झाल्यानंतर आता खटला सुरू आहे. अशा परिस्थितीत आरोपीला जामिनावर सोडणे योग्य ठरणार नाही, असे न्यायालयाने आदेशात नमूद केले.

# गोंदियात दरोडेखोरांना अटक हत्यारे व रोख रक्कम जप्त

■ गोंदिया

**गोंदियात** आज पोलिसांनी पुन्हा एकदा सराईत गुन्हेगारांचा कट उधळला असून, दरोड्याच्या तयारीत असलेल्या दोन दरोडेखोरांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून तलवार, कोयता, मिरची पावडर व रोख रक्कम जप्त केली आहे. या कारवाई दरम्यान त्यांचे इतर साथीदार अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. गोंदिया पोलीस काल मध्यरात्री गस्त घालत असताना त्यांना कुंभारेनगर परिसरातील आंबेडकर भवन जवळ काही संशयित हालचाली दिसल्या. त्यांना हटकले असता ते दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेले आढळले.

# मेट्रो स्थानक ते विमानतळाला जोडणारा पादचारी पूल सेवेत

■ मुंबई

**मुंबई** महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मेट्रो प्रवाशांना मोठा दिलासा दिला आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ-आरे भुयारी मेट्रो मार्गिकेतील टर्मिनल २ मेट्रो स्थानकावरून आता थेट छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २ ला जोडणारा पादचारी पूल सुरू करण्यात आला आहे. विमानतळाजवळ ८८ मीटर लांबी, ४.३ मीटर रुंदी आणि ३ मीटर उंचीचा फुटओव्हर ब्रिज उभारण्यात आला असून तो प्रवाशांच्या सेवेत दाखल झाला आहे. हा पूल स्टीलचा जमिनीपासून तब्बल २३ मीटर उंचीवर उभारण्यात आला आहे.

# रशियाच्या रियाझानमधील औद्योगिक कारखान्यात स्फोट

■ मॉस्को

**११ जणांचा मृत्यू**

**रशियाच्या** रियाझान प्रदेशातील औद्योगिक कारखान्यात झालेल्या स्फोटात ११ जणांचा मृत्यू झाला आणि १३० जण जखमी झाले. त्यातील २९ जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यापैकी १३ जणांना रियाझानमधील वैद्यकीय केंद्रांमध्ये आणि १६ जणांना मॉस्कोमधील वैद्यकीय केंद्रांमध्ये दाखल करण्यात आले. हा स्फोट गनपावडर बनवण्याच्या विभागात लागलेल्या आगीमुळे झाला. याशिवाय, सोमवारी रियाझान प्रदेशात एक दिवसाचा शोक जाहीर करण्यात आला आहे. रियाझानचे गव्हर्नर पावेल मालकोव्ह यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, संपूर्ण प्रदेशात राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर आणले. सांस्कृतिक संस्था, टेलिव्हिजन आणि रेडिओ कंपन्या आणि संघटनांना मनोरंजन कार्यक्रम रद्द करण्याचे आदेश देण्यात आले.

# चीनकडून पाकिस्तानला तिसरी हँगर पाणबुडी सुपूर्द

■ बीजिंग

**हुबेई** प्रांतात झालेल्या सोहळ्यात चीनकडून पाकिस्तानला हँगर श्रेणीची पाणबुडी हस्तांतरित करण्यात आली. पाकिस्तानचे नौदल सामर्थ्य वाढवण्याच्या उद्देशाने चीनकडून पाकिस्तानला देण्यात येणाऱ्या ८ पाणबुड्यांपैकी ही तिसरी पाणबुडी आहे. यापूर्वी मार्च महिन्यात दुसरी पाणबुडी पाकिस्तानला दिली गेली होती.

चीनकडून गेल्या काही वर्षात या पाणबुड्यांव्यतिरिक्त काही विनाशिका जहाज देखील दिल्या गेल्या. चीनने अरबी समुद्रामध्ये आपल्या नौदलाचा प्रभाव वाढवण्यास गेल्या काही वर्षांपासून सुरुवात केली. चीनने पाकिस्तानमधील बलुचिस्तान प्रांतातील ग्वादर बंदर देखील विकसित केले.

# मुंबई लुटली असती तर ९० हजार कोटी शिल्लक राहिले असते का?

■ मुंबई

**राऊतांचा पलटवार**

**दहीहंडीच्या** निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई महापालिकेला लुटणाऱ्यांवर हल्लाबोल करत मनपाला लुटणाऱ्यांची हंडी आम्ही फोडू, असा इशारा दिला. यावर उबाठा खासदार संजय राऊत यांनी जोरदार पलटवार करत सवाल केला की, आम्ही मुंबई लुटली असती तर ९० हजार कोटींच्या ठेवी पालिकेकडे शिल्लक राहिल्या असत्या का?

ते पुढे म्हणाले की, आताच्या नगरविकास मंत्र्यांनी मुख्यमंत्री असताना २ लाख कोटींच्या कामांचे वाटप केले. पण त्या कामांबाबत पारदर्शकता नाही. या कामांचे २५ टक्के कमिशन काहींच्या खिशात गेले आहे. त्यामध्ये फडणवीस यांच्या निकटवर्तीयांचा समावेश आहे. महापालिका कोणी लुटली हे मुंबईकरांना माहीत आहे. दहीहंडीच्या निमित्ताने लुटमार करणाऱ्यांच्या हंड्या फोडत तुम्ही ठाणे-मुंबई फिरता, पण खरे लुटेरे तुमच्याच आजूबाजूला आहेत. हंडीतील दही-लोणी ज्यांनी लुबाडून खाल्ले त्यांच्याच हंड्या तुम्ही फोडत आहात. तुमच्याभोवती चोर-लफंगे आहेत, त्यांना पाठीशी घालू नका. महाराष्ट्र माफ करणार नाही. गौतम अदानींची हंडी फोडणारे आणि मलाई खाणारे हेच लोक आहेत. मुंबईतील अनेक महत्त्वाचे भूखंड अदानींच्या ताब्यात गेले आहेत. फडणवीस आमच्यावर टीका करतात हेच हास्यास्पद आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यानंतर देवेंद्र फडणवीस हे राजकारणातील जोकर बनले आहेत.

ते पुढे म्हणाले की, २०२४ मध्ये निवडणूक आयुक्त असलेले राजीव कुमार कुठे आहेत? माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड जसे बेपत्ता झाले तसेच राजीव कुमारही बेपत्ता झाले आहेत?

# एअर कॅनडा विमानसेवा ठप्प! १० हजार हवाईसुंदरींचा संप

■ ओटावा

**कॅनडाची** प्रमुख विमान कंपनी एअर कॅनडाने सर्व आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत विमानसेवा तात्पुरत्या स्वरूपात थांबवल्या आहेत. कंपनीतील तब्बल १०,००० हून अधिक हवाईसुंदरींच्या संपामुळे ही अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. या संपामुळे जगभरातील सुमारे १.३ लाख प्रवाशांच्या प्रवासावर मोठा परिणाम झाला असून, त्यात २५,००० हून अधिक कॅनडियन नागरिक परदेशात अडकले आहेत.

कॅनेडियन युनियन ऑफ पब्लिक एम्प्लॉईज या संघटनेने सांगितले की, एअर कॅनडा कंपनीने चार वर्षांत ३८ टक्के वेतनवाढीचा प्रस्ताव दिला होता. पण त्यातील पहिल्या वर्षी केवळ ८ टक्के वाढ देण्याचा प्रस्ताव संघटनेला मान्य झाला नाही. कंपनीने मंगळवारपासून वेतन व अर्धपगारी वेळेबाबत चाललेल्या चर्चांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. शुक्रवारी कंपनीने सरकारमार्फत मध्यस्थीची मागणी केली होती. मात्र संघटनेने हा पर्याय नाकारला. त्यामुळे संपाची घोषणा करण्यात आली.




या संपामुळे एअर कॅनडा व एअर कॅनडा रूज या दोन्ही सेवा पूर्णपणे ठप्प झाल्या आहेत. मात्र, एअर कॅनडा एक्स्प्रेस ही सेवा, जी तृतीय पक्ष विमान कंपन्यांमार्फत चालवली जाते, ती नेहमीप्रमाणे सुरू राहणार आहे. संप कायम राहिल्यास दररोज सुमारे १,३०,००० प्रवाशांना फटका बसू शकतो.

देश विदेश

# गोव्यात खासगी विद्यापीठाला राज्य सरकारकडून मान्यता

■ पणजी

**गोव्यात** खासगी विद्यापीठ कायद्याअंतर्गत राज्य सरकारने बडोदा (गुजरात) येथील पारुल विद्यापीठाला गोव्यात पहिले खासगी विद्यापीठ म्हणून मान्यता दिली आहे. किटला-केपे येथील ओएनजीसीजवळील सर्व्हे क्र. ७८/१ या ठिकाणी विद्यापीठाचा कॅम्पस उभारण्यात येत आहे.

या संदर्भातील अधिसूचना उच्च शिक्षण संचालनालयाने जारी केली. राज्यात खासगी विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी २०२० साली कायदा संमत करण्यात आला होता. या कायद्याअंतर्गत पारुल विद्यापीठाला मान्यता मिळाली असून, किटला येथील कॅम्पस पूर्ण झाल्यावर सरकारने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांसाठी यावर्षीपासूनच प्रवेशप्रक्रिया सुरू होणार आहे. हे विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर त्याचा गोवा विद्यापीठाशी कोणताही संबंध राहणार नाही.

# केजरीवाल यांच्या निवास प्रकरण याचिकेवर २५ ऑगस्टला सुनावणी

■ नवी दिल्ली

**आम** आदमी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांना शासकीय निवास उपलब्ध करून देण्याच्या आपने दाखल केलेल्या याचिकेवर २५ ऑगस्टला सुनावणी होणार आहे. न्या. सचिन दत्ता यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होईल.

या याचिकेनुसार राजकीय पक्षांना निवास देण्याच्या मार्गदर्शक तत्वांनुसार राष्ट्रीय पक्ष मान्यताप्राप्त असल्यास त्याचा अध्यक्ष दिल्लीत शासकीय निवास घेण्यास पात्र असतो. जर त्याच्याकडे स्वतःचे घर नसेल किंवा दुसऱ्या कोणत्याही अधिकृत पदावरून निवास नेमणूक मिळालेली नसेल तर त्याला घर द्यावेच लागते.

# पत्रकार राघवेंद्र वाजपेयी हत्या! ५ महिन्यांनंतरही न्याय नाही


■ सीतापूर



**उत्तर प्रदेशातील** सीतापूर जिल्ह्यातील महोली येथील पत्रकार राघवेंद्र वाजपेयी यांची ५ महिन्यांपूर्वी भरदिवसा गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. मात्र, त्यांच्या कुटुंबियांना अजूनही न्याय मिळालेला नाही. भ्रष्टाचाराच्याविरोधात बातम्या दिल्यामुळे कंत्राटी मारेकऱ्याकडून त्याची हत्या करण्यात आल्याचा आरोप आहे.

राघवेंद्र यांची पत्नी रश्मी म्हणाल्या की, ८ मार्च रोजी राघवेंद्र दुपारी विश्रांती घेतल्यानंतर सीतापूरला जायचे सांगून घरातून बाहेर पडले. काही तासांत त्यांच्या अपघाताची माहिती मित्राकडून मिळाली. रुग्णालयात पोहोचल्यावर त्यांना तीन गोळ्या लागलेल्या अवस्थेत स्ट्रेचरवर पाहिले. शवविच्छेदनात गोळी लागल्याने त्यांची हत्या झाल्याचे उघड झाले आहे. तहसील कार्यालयातील जमीन आणि धान खरेदीतील घोटाळ्यांची बातमी त्यांनी दिली होती. त्यामुळे काही अधिकाऱ्यांची बदली झाली होती. त्यानंतर राघवेंद्र यांना अनेक धमक्या मिळत होत्या.

लेखपाल, तहसीलदार आणि भू-माफियांच्या संगनमतातून त्यांची हत्या झाल्याचा संशय राघवेंद्र यांच्या पत्नीचा संशय आहे. पोलिसांनी मात्र मंदिरातील बाबा शिवानंद यांच्यावर ब्लॅकमेलिंगमुळे हत्या घडवून आणल्याचा आरोप ठेवत त्याच्यासह दोन जणांना अटक केली आहे. या प्रकरणातील राजू तिवारी (रिजवान खान) आणि संजय तिवारी (अकील खान) या दोन संशयितांना पोलिसांनी ७ ऑगस्ट रोजी चकमकीत ठार केले. पोलिसांच्या मते, हत्येवेळी ते दोघे घटनास्थळी उपस्थित होते. मात्र वाजपेयी कुटुंबियांनी या चकमकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून खरे सूत्रधार मोकाट असल्याचा आरोप केला आहे.

दि बेस्ट एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक (सन २०२५ ते सन 2030)
सहकार समृद्धी
श्रमिक उत्कर्ष सभा
प्रणित
● समर्थ बेस्ट कामगार संघटना ● बेस्ट राष्ट्रीय कर्मचारी सेना
● दि इलेक्ट्रिक युनियन ● एससी एसटी वेल्फेअर असोसिएशन
● बहुजन एम्प्लॉईज युनियन
यांचे
सहकार समृध्दी पॅनेल
सहकारातून वृध्दी..... वृध्दीतून समृध्दी !

निशाणी

कप बशी
प्रकाशक : बाबा कदम – ८०८७५ ४८२९८
निवडणूक मतदान दिनांक व वेळ –
सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी
सकाळी ९.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत
मा. आमदार प्रसाद लाड साहेब
अध्यक्ष, श्रमिक उत्कर्ष सभा
निर्धार पक्का ...! प्रस्थापितांना देऊ धक्का !
सहकार समृध्दी पॅनलला बहुमतांनी विजयी करा !

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# त्र्यंबकेश्वरला संघर्षाचेच प्रदर्शन

**श्रावण** महिना म्हणजे भगवान शंकराच्या उपासनेचा महिना मानला जातो. महाराष्ट्राच्या भूमीला ही ईश्वरी देणगी म्हणावी लागेल की, जवळपास चार ज्योतिर्लिंगं महाराष्ट्रात आहेत आणि त्यातील त्र्यंबकेश्वरच्या ज्योतिर्लिंगाला सर्वाधिक महत्त्व असते. तिथे येणाऱ्या भाविकांची संख्या देखील प्रचंड प्रमाणात असते. गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये तर तिथे येणाऱ्या भाविकांच्या संख्येमध्ये पाचपट ते दहापट वाढ झालेली आहे. पण त्या तुलनेमध्ये तिथल्या सोयी-सुविधांमध्ये कोणतीही फारशी सुधारणा झालेली दिसत नाही. म्हणून वर्षातून पाच-दहा वेळा तरी त्र्यंबकेश्वर मंदिरात भाविक आणि तिथल्या स्थानिक प्रशासनाशी बाचाबाची होते, संघर्ष उडतात, वेगवेगळ्या कारणांवरून भांडण होतात. हा प्रकार सातत्याने सुरू आहे. तिथल्या विश्वस्त मंडळाचा आणि भाविकांबरोबरचा समन्वय कधीही नीट साधला गेला नाही. म्हणूनच अगदी यावेळी श्रावण महिन्यामध्ये जवळपास दोन ते तीन वेळा भाविकांबरोबर बाचाबाची किंवा संघर्ष होण्याचे प्रकार घडले. आतासुद्धा अचानकपणे मुखदर्शन दरवाजा बंद केला गेला आणि भाविकांची प्रचंड अडचण झाली. श्रावण महिना आणि त्यात भाविकांची झालेली गर्दी अशा परिस्थितीमध्ये एखादा जरी दरवाजा बंद केला तरी भाविकांची प्रचंड कोंडी होते. जवळजवळ एकेक दोन दोन किलोमीटरच्या रांगा लागतात आणि भाविकांना पावसामध्ये सुद्धा उभे राहावे लागते. कारण त्र्यंबकेश्वर हा परिसर अत्यंत निसर्ग संपन्न असल्यामुळे तिथे पावसाचा जोर कायम जास्त असतो आणि श्रावण महिन्यात अक्षरशः संततधार असा प्रकार त्या भागामध्ये पाहायला मिळतो. भर पावसामध्ये तीन-तीन तास रांगेमध्ये बाहेर उभे राहण्याची वेळ भाविकांवर येत असते आणि अचानकपणे प्रशासन अशा प्रकारचे निर्णय घेते. ते निर्णय घेताना भाविकांना कोणतीही पूर्वकल्पना दिली जात नाही. अगदी ज्याला व्हीआयपी पास म्हणतात यासाठी सुद्धा लोक दोनशे-तीनशे रुपये खर्च करून त्यासाठी सुद्धा दोन-दोन तास रांगेत जाऊन पास खरेदी करतात, पण प्रत्यक्ष त्यांच्या दर्शनाच्या वेळेला जी कोंडी व्हायची ती होतच असते.

**समन्वयाचा अभाव**

खरे तर इथल्या विश्वस्त मंडळाने, स्थानिक प्रशासनाने तिथल्या नगरपालिकेने आणि पोलीस प्रशासनाने नीट समन्वय साधून भाविकांना अधिकाधिक चांगल्या प्रकारे कशा सुविधा देता येईल याचा विचार करायला हवा. परंतु असे करण्याची कोणालाही गरज भासत नाही. भाविकांना गरज आहे ते वाटेल तेवढा वेळ रांगेत उभे राहतील किंवा त्यांना तिष्ठत ठेवण्यामध्ये या लोकांना आनंद वाटतो की काय असे म्हणण्याची वेळ येते. नुकत्याच झालेल्या घटनेमध्ये अचानक दरवाजा बंद केल्यामुळे अनेक भाविकांना तिष्ठत उभे राहावे लागले आणि अक्षरशः संताप झालेल्या भाविकांनी तिथल्या दरवाजावर लत्ताप्रहार करून तो दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. स्वाभाविकपणे पोलिसांशी आणि कर्मचाऱ्यांशी झटापट झाल्याने त्या संतप्त भाविकालाही चोप दिला गेला. परंतु कुठेतरी भाविकांच्या सहनशीलतेचा अंत होत असतो. पोलीस आणि तिथले कर्मचारी कधीही सौजन्याने वागत नाहीत हीदेखील वस्तुस्थिती आहे. सतत भाविकांना धक्काबुक्की करणे, रांगेतल्या भाविकांना पुढे ढकलण्याचा प्रकार करणे, प्रत्यक्ष शिवलिंगाचे दर्शन घेताना सुद्धा अर्धा क्षण सुद्धा तिथे उभे राहायला मिळत नाही इतकी विचित्र अवस्था त्र्यंबकेश्वर देवस्थानाची झालेली आहे. एकीकडे वाराणशीत काशिविश्वनाथाच्या मंदिरात अत्यंत सुंदर कॉरिडॉर झालेला आहे. उज्जैनच्या महांकालेश्वरला सुद्धा व्यवस्थित रांगा लावून भाविकांची अधिकाधिक काळजी घेतली जाते. या सगळ्या ठिकाणी अत्यंत चांगल्या पद्धतीने भाविकांची दर्शनाची सोय केली जाते. परंतु त्रंबकेश्वरच्या बाबतीत सरकार उदासीन आहे आणि स्थानिक नगरपालिका पोलीस आणि विश्वस्त मंडळ देखील प्रचंड उदासीन असल्याचे पाहायला मिळते. काहीतरी तात्पुरत्या छोट्या छोट्या सोयी-सुविधा केल्या जातात. परंतु त्याचा कोणताही मोठा लाभ होत नाही. अत्यंत आनंदाने आणि समाधानाने त्रंबकेश्वरचे दर्शन होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे.

**महाजन आणि महादेव**

मध्यंतरी मुख्यमंत्र्यांनी सगळ्या चारही ज्योतिर्लिंगांसाठी स्वतंत्र आयएएस अधिकारी नेमण्याचा निर्णय घेतला, तो निर्णय अतिशय योग्य आहे. परंतु आयएएस अधिकारी आल्यानंतर तिथल्या या सगळ्या प्रशासन व्यवस्थेमध्ये किंवा प्राधान्याने भाविकांना चांगल्या पद्धतीने व्यवस्थित दर्शन मिळेल अशा प्रकारची व्यवस्था होणार असेल तरच अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात काहीतरी अर्थ आहे. अन्यथा केवळ अधिकाऱ्यांची वर्णी लावायची एवढाच त्याचा मर्यादित अर्थ होऊ शकेल. परंतु आयएएस अधिकारी आल्याने निदान तिथल्या व्यवस्थांना काहीतरी शिस्त येऊ शकते. आयएएस अधिकाऱ्याच्या माध्यमातून त्र्यंबकेश्वर मंदिरात प्रामुख्याने भाविकांच्या दर्शनाची काळजी घेतली गेली तरी तो एक मोठा दिलासादायक निर्णय ठरू शकतो. त्र्यंबकेश्वरला भाविकांमध्ये सातत्याने उद्भवणारे वाद आता संपुष्टात आणण्याची आवश्यकता आहे. सध्या महादेवाच्या दर्शनाऐवजी संघर्षाचे प्रदर्शन सुरू आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी जर इथल्या प्रशासन व्यवस्थेत सुधारणा झाली नाही, तर त्या काळात तिथली परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते. कारण कुंभमेळा काळात तर प्रचंड गर्दी होते. कुंभमेळ्यापूर्वीची ही एक रंगीत तालिमच समजली पाहिजे. तिथल्या पालकमंत्र्यांना या प्रकाराशी काही देणेघेणे उरलेले दिसत नाही, त्यांच्या डोळ्यासमोर फक्त नाशिक महानगरपालिकेचीच निवडणूक आहे. संकटमोचन गिरीश महाजनांना हे संकट दूर करण्याची बुद्धी महादेवाने दिली पाहिजे. सिंहस्थ कुंभमेळा ही भाविकांसाठी अत्यंत महत्त्वाची पर्वणी असते. पण सध्यातरी नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमधली एकूण परिस्थिती पाहता हा सिंहस्थ राजकीय स्वार्थाचीच पर्वणी ठरते आहे. नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा वादही गाजतो आहे. त्र्यंबकेश्वर आणि तीन मंत्र्यांची पालक मंत्रिपदासाठी सुरू असलेली चढाओढही अधिकाधिक तीव्र होत चाललेली दिसते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**काळ आणि नशीब दोन्हीही बदलणारे आहेत, त्याबद्दल कधीही अहंकार बाळगू नये.**

## पंचांग

**सोमवार, १८ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
**श्रावण कृष्ण दशमी**

नक्षत्र : मृग

-: जन्मराशी :-
००-०१ ते १४-४० वृषभ
१४-४१ ते २४-०० मिथुन

रवी उदय- ०६-२२
रवी अस्त- १९-०३

नेताजी सुभाषचंद्र बोस पुण्यतिथी, श्रावणी सोमवार, शिवामूठ-जवस; श्रीकृष्ण सरस्वती महाराज पुण्यतिथी

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### उपवासाचा दहीवडा



★**साहित्य -** उकडून घेतलेले बटाटे - ३, राजगिरा व शिंगाडा पीठ प्रत्येकी १-१ वाटी, शेंगदाणेकूट एक कप, दही मोठ्या तीन वाट्या, हिरव्या मिरच्या ४, जिरे अर्धा चमचा, आले किसून १ छोटा चमचा, मीठ, चिरलेली थोडी कोथिंबीर, तूप तळणीसाठी

★**कृती-** एका मोठ्या भांड्यात उकडलेल्या बटाट्याची साले काढून मॅश करून घ्यावे. त्यात शेंगदाणे कूट, राजगिरा व शिंगाडा पीठ, हिरवी मिरची, जिरे, मीठ टाकून सर्व पदार्थ एकजीव मळून घ्या. या मिश्रणाचे लाडूच्या आकाराचे लहानसर गोळे करा. कढईत तूप गरम करा. हे गोळे लालसर रंगावर तळून घ्या. नंतर एका प्लेटमध्ये दही घ्या. त्यात मिरची, आले किसलेले, मीठ घाला. दही तसेच पाणी न टाकता रवीने घुसळून घ्या. यात तळलेले गोळे टाका. वरून चिरलेली कोथिंबीर टाका. जर थंड घ्यायला आवडत असेल तर फ्रिजमध्ये ठेवा. नंतर खा.



# आशिया क्रिकेट कपसाठी पाकिस्तानी संघाची घोषणा बाबर आझम व मोहम्मद रिझवानला संधी नाही



**सौदीमध्ये आशिया क्रिकेट कप आणि त्याआधी होणाऱ्या तिरंगी मालिकेसाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने १७ सदस्यीय टी-२० संघाची घोषणा केली. या संघात बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान यांचा समावेश करण्यात आलेला नाही. संघाचे नेतृत्व अष्टपैलू सलमान आगा यांच्याकडे सोपवण्यात आले.**

■ कराची

या स्पर्धा ९ ते २८ सप्टेंबरपर्यंत सौदीत खेळवली जाईल. या तिरंगी मालिकेत पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि यूएई हे संघ सहभागी होतील. बाबर आझम शेवटचा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना डिसेंबर २०२४ मध्ये खेळला होता. त्यानंतर, त्याने पाकिस्तान सुपर लीग (पीएसएल) २०२५ मध्ये काही चांगल्या खेळी केल्या, ज्यामध्ये ५६*, ५३* आणि ९४ धावांचा समावेश होता. वेस्ट इंडिजविरुद्धच्या अलिकडच्या एकदिवसीय मालिकेत त्याची धावसंख्या ४७, ० आणि ९ होती. रिझवानला अलिकडच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत (बांगलादेशविरुद्ध घरच्या मैदानावर आणि वेस्ट इंडिजमध्ये) स्थान देण्यात आले नव्हते. वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत त्याने पहिल्या सामन्यात ५३ धावा केल्या. परंतु पुढील दोन सामन्यांमध्ये तो फक्त १६ आणि ० धावा करू शकला. फखर झमान तंदुरुस्त झाला आहे. वेस्ट इंडिज दौऱ्यादरम्यान त्याला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली होती. परंतु आता त्याला आशिया कप आणि तिरंगी मालिकेसाठी संघात समाविष्ट करण्यात आले आहे.

भारत, पाकिस्तान, ओमान आणि युएई यांना एकाच गटात स्थान देण्यात आले आहे. श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि हाँगकाँग हे गट 'ब' मध्ये आहेत. गटातील सर्व संघ एकमेकांविरुद्ध १-१ सामने खेळतील. भारताचा सामना १० सप्टेंबर रोजी युएई, १४ सप्टेंबर रोजी पाकिस्तान आणि १९ सप्टेंबर रोजी ओमानशी होईल. जर भारत आणि पाकिस्तान सुपर-४ टप्प्यांत पोहोचले तर दोन्ही संघ २१ सप्टेंबर रोजी पुन्हा एकदा एकमेकांसमोर येतील. स्पर्धेचा अंतिम सामना २८ सप्टेंबर रोजी खेळवला जाईल. जर भारत आणि पाकिस्तान सुपर-४ टप्प्यांत अव्वल स्थानावर राहिले तर स्पर्धेत दोघांमध्ये तिसरा सामना होऊ शकतो.

**पाकिस्तानी संघ**

सलमान आगा (कर्णधार), अबरार अहमद, फहीम अश्रफ, फखर जमान, हरिस रौफ, हसन अली, हसन नवाज, हुसैन तलत, खुशदिल शाह, मोहम्मद हारिस (यष्टीरक्षक), मोहम्मद नवाज, मोहम्मद वसीम, साहिबजादा फरहान, सैम अयुब, सलमान मिर्झा, शाहीन शाह आफ्रिदी, सुफियान मोकीम.

# आयसीसी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेसाठी १९ वर्षांखालील अमेरिकेचा संघ पात्र

**कॅनडाचा पराभव**

■ रिदाल (जॉर्जिया)

पुढील वर्षी होणाऱ्या आयसीसीच्या १९ वर्षांखालील वयोगटाच्या पुरुषांच्या युवा विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी अमेरिकेने आपली पात्रता सिद्ध केली. या स्पर्धेसाठी सुरू असलेल्या दुहेरी राऊंड रॉबिनच्या पात्र फेरी स्पर्धेत अर्जुन महेशच्या नेतृत्वाखालील अमेरिकन संघाने कॅनडा, बर्मुडा आणि अर्जेंटिना या संघाचा पराभव करत आपली पात्रता सिद्ध केली. अमेरिकन संघाचा पात्रता फेरीतील अद्याप एक सामना बाकी आहे. पात्रता फेरीतील खेळविण्यात आलेल्या सामन्यात अमेरिकेने कॅनडाचा ६५ धावांनी पराभव केला.

या पात्रता फेरीचा निम्मा टप्पा संपला असून, अमेरिकेने ३ मोठे विजय नोंदवित आयसीसीच्या १९ वर्षांखालील वयोगटातील युवा विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत स्थान मिळविण्याचा इतिहास घडविला. अमेरिकन संघातील गोलंदाजांनी आपल्या दर्जेदार कामगिरीच्या जोरावर बर्मुडा आणि अर्जेंटिना यांचा पराभव करत आपल्या संघाला १० गुण मिळवून दिले. आता पात्रतेसाठी अमेरिकेकडे पुरेसे गुण झाले. अमेरिकन संघातील आघाडीचा फलंदाज अमरिंदरसिंग गिलने ३ सामन्यांत १९९ धावा जमविल्या. तर अनिश राय आणि साहीर भाटीया या गोलंदाजांनी प्रत्येकी ७ गडी बाद केले आहेत. २०२४ साली द. आफ्रिकेत झालेल्या आयसीसीच्या १९ वर्षांखालील युवा विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आघाडीचे १० संघ २०२६ च्या स्पर्धेसाठी थेट पात्र ठरले.

# फिटनेस टेस्टमध्ये सूर्यकुमार पास

■ बंगळुरू

भारतीय टी-२० क्रिकेट संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने फिटनेस चाचणी उत्तीर्ण केली. आता तो ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशिया कपमध्ये भारतीय टी-२० संघाचे नेतृत्व करेल. शस्त्रक्रियेनंतर पुनर्प्राप्ती जून २०२५ मध्ये जर्मनीतील म्युनिक येथे सूर्यकुमार यादववर स्पोर्ट्स हर्निया (उजव्या खालच्या ओटीपोटावर) शस्त्रक्रिया करण्यात आली.

# सिनसिनाटी टेनिस ओपन स्पर्धा! उद्या सिनर, अल्काराझ भिडणार

■ सिनसिनाटी



जागतिक टेनिस क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या जॅनिक सिनरने त्याच्या २४ व्या वाढदिवशी सिनसिनाटी टेनिस ओपनमध्ये शानदार विजय नोंदवला. त्याने उपांत्य फेरीत फ्रेंच पात्रता फेरीतील टेरेन्स एटमनचा ७-६, ६-२ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. आता अंतिम फेरीत मंगळवार सिनरचा सामना स्पॅनिश स्टार कार्लोस अल्काराझशी होईल.

ज्याने दुसऱ्या उपांत्य फेरीत अलेक्झांडर झ्वेरेव्हचा ६-४, ६-३ असा पराभव केला. आतापर्यंत सिनर आणि अल्काराज यांच्यात १३ सामने झाले आहेत. यामध्ये अल्काराझने ८ वेळा विजय मिळवला आहे तर सिनरने ५ वेळा विजय मिळवला आहे. एटमनने फ्रिट्झ-रुएनला हरवले. संपूर्ण सामन्यात सिनरने उत्कृष्ट सर्व्हिस दिली आणि पहिल्या सेटमध्ये त्याला एकही ब्रेक पॉईंट मिळाला नाही. दुसरीकडे एटमेनने एक स्वप्नवत स्पर्धा खेळली जिथे त्याने टेलर फ्रिट्झ आणि होल्गर रून सारख्या खेळाडूंना पराभूत करून सर्वांना आश्चर्यचकित केले. सामन्यापूर्वी, एटमेनने सिनेरला त्याच्या वाढदिवसानिमित्त पिकाचूसह एक पोकेमॉन कार्ड भेट दिले. गेल्या महिन्यात विम्बल्डन पुरुष एकेरीत अल्काराझला हरवून सिनरने विजेतेपद पटकावले. विम्बल्डन चॅम्पियनशिपचे पुरुष एकेरीचे विजेतेपद जिंकणारा तो पहिला इटालियन खेळाडू ठरला. या विजयासह सिनरने अल्काराझसोबत ५ आठवड्यांचा जुना स्कोअरही बरोबरीत सोडवला. ८ जून २०२५ रोजी अल्काराझने सिनेरचा पराभव करून फ्रेंच ओपनचे विजेतेपद जिंकले.

# फलंदाजाच्या शॉर्ट रनबाबत बीसीसीआयचा नवीन नियम

■ मुंबई

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने देशांतर्गत क्रिकेटमध्ये शॉर्ट रनबाबत नवा नियम लागू केला. या नव्या नियमांनुसार एखाद्या फलंदाजाने मुद्दाम शॉर्ट रन घेतल्यास क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाच्या कर्णधाराला कोणता फलंदाज स्ट्राईकवर ठेवायचा हे ठरविण्याचा अधिकार मिळेल. फलंदाज मुद्दाम शॉर्ट रन घेतात, जेणेकरून अनुभवी फलंदाज स्ट्राईकवर येऊ शकेल. जेव्हा अनुभवी फलंदाज खालच्या क्रमांकावरील खेळाडूसोबत खेळत असतो, तेव्हा तो जास्त वेळ स्ट्राईकवर राहण्याचा प्रयत्न करतो. टी-२० क्रिकेट, फ्रँचायझी क्रिकेट आणि आयपीएलमध्ये असे प्रकार काही वेळा दिसून आले. यापूर्वी शॉर्ट रनसाठी नियम अस्तित्वात होते.

# जुहू विलेपार्ले जिमखाना कॅरम स्पर्धा मुंबईच्या सार्थ मोरेची आगेकूच

■ मुंबई



जुहू विलेपार्ले जिमखान्यात सुरू असलेल्या पहिल्या जुहू विलेपार्ले जिमखाना राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत मुंबईच्या युवा कॅरमपटू सार्थ मोरेने मुंबईच्या अनुभवी राष्ट्रीय कॅरम खेळाडू गिरीश तांबेवर सरळ दोन सेटमध्ये २५-७, २२-८ असा विजय मिळवून चौथ्या फेरीत प्रवेश केला आणि सर्वांचे लक्ष वेधून घेतले. स्पर्धेचे उद्घाटन जुहू विलेपार्ले जिमखान्याचे कॅरम व टेबल टेनिस विभागाचे सचिव संजीव शहा यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे सचिव अरुण केदार, खजिनदार अजित सावंत आणि सहसचिव केतन चिखले उपस्थित होते.

# बीओबी ट्रॉफी बुद्धिबळ स्पर्धेत झियान, शिवांश, अथर्व गटविजेते


■ मुंबई



आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे बँक ऑफ बडोदा पुरस्कृत स्वातंत्र्य दिनानिमित्त झालेल्या बीओबी ट्रॉफी बुद्धिबळ स्पर्धेमध्ये ८ वर्षांखालील गटात झियान नागरेचाने, ११ वर्षांखालील गटात शिवांश गिरीने आणि १४ वर्षांखालील गटात अथर्व देशमुखने सर्वाधिक ४.५ गुण घेत गटविजेतेपद पटकाविले. फिडे गुणांकित शिवांश गिरीने प्रथम स्थानावर झेप घेताना निर्णायक पाचव्या फेरीपर्यंत आघाडीवर राहिलेल्या फिडे गुणांकित धैर्य बिजलवानचा (४ गुण) २८ व्या मिनिटाला पराभव केला. आरएमएमएस व मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटना सहकार्यित बँक ऑफ बडोदा चषक बुद्धिबळ स्पर्धेमधील ८ वर्षांखालील गटात झियान नागरेचाने (४.५ गुण) प्रथम, मानवा पारकरने (४ गुण) द्वितीय, ईशी सिंगने (४ गुण) तृतीय, रिहान दुबेने (४ गुण) चौथा, हस्ती शाहने (३.५ गुण) पाचवा, जितेज गाडगेने (३ गुण) सहावा; ११ वर्षांखालील गटात शिवांश गिरीने (४.५ गुण) प्रथम, धैर्य बिजलवानने (४ गुण) द्वितीय, श्लोक पवारने (४ गुण) तृतीय, मृण्मयी डावरेने (४ गुण) चौथा, नैतिक पालकरने (४ गुण) पाचवा, लक्ष परमारने (३.५ गुण) सहावा तर १४ वर्षांखालील गटात अथर्व देशमुखने (४.५ गुण) प्रथम, अरीहा देवरुखकरने (४ गुण) द्वितीय, मुमुक्षु मिटकरने (४ गुण) तृतीय. निव विंगोलेने (३.५ गुण) चौथा, आद्रिक अग्रवालने (३.५ गुण) पाचवा, अर्जुन पधारीयाने (३.५ गुण) सहावा पुरस्कार जिंकला.

# वडिलांच्या आकांक्षेवर पाणी सोडणाऱ्या मुलाची कथा – कोर्ट कचहरी सीझन १

**गेल्या आठवड्यात सोनी लिव या ओटीटी प्लॅटफॉर्मवर ''कोर्ट कचहरी'' ही कोर्ट नाट्याच्या पार्श्वभूमीवरील वडील-मुलाची कथा असलेली सीरिज प्रदर्शित झाली आहे. खूप उत्कृष्ट म्हणावी अशी ही सीरिज नसली, तरी कलाकारांचा अभिनय आणि सीरिजमधील नाट्य यामुळे टाइमपास म्हणून ही सीरिज बघायला काहीच हरकत नाही.**




## कथानक

नुकताच वकीलाची पदवी संपादन केलेला सरजनपूर या छोट्याशा शहरातील परम याला त्याच्या वडिलांकडून वारशाने वकिली मिळाली आहे. त्याचे वडील वकील हरीश माथुर यांचा या क्षेत्रात दबदबा आहे. परंतु लहानपणी डोळ्यांसमोर बघितलेले खून, न्याय मिळवण्याच्या हेतूने वडिलांना घरी भेटायला येणाऱ्या गुंड प्रवतीच्या किंवा पैसेवाल्यांच्या वर्तनाने परमच्या मनात वकिलीच्या व्यवसायाबद्दल तिरस्कार निर्माण झाला असतो. वकील खोटं बोलतात असे त्याचे मत बनले आहे. बालपणीच आईचे निधन झाल्यानंतर वडिलांनीच परमचे पालनपोषण केले असते व त्याच्या मनावर वडिलांचा धाक असतो त्यामुळे इच्छा नसताना सुध्दा केवळ वडिलांच्या इच्छेमुळे तो कायद्याची पदवी मिळवली आहे. अनुभव मिळवण्यासाठी तो आता वडिलांसह ग्रामीण जिल्हा कोर्टात जाऊ लागतो खरा, परंतु यातून कसे सुटता येईल हा विचार चोवीस तास त्याच्या मनात असतो. वकील म्हणून कारकिर्द करण्यापासून व वडिलांच्या अधिपत्यातून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी तो कधी हॉटेल मॅनेजमेंटची नकली डिग्री मिळवायचा प्रयत्न करतो, तर कधी कॅनडाला जाऊन नोकरी करण्याचा विचार करतो. अशाच स्थितीत एक दिवस हरीश माथुर एका केसचे संशोधन करण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपवतात. परंतु आपले वडील खोटी बाजू मांडून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करत आहेत, असे त्याला वाटत असते. त्यामुळे तो वडिलांच्या अशिलाच्या बाजूने संशोधन करण्याऐवजी त्याच्या विरोधात पुरावे गोळा करतो. त्याच दरम्यान त्याला कॅनडाचा व्हिसा मिळतो. पुढे काय होते? परम कॅनडाला जातो का? त्याने मिळवलेले पुरावे योग्य असतात की अयोग्य? त्याचा स्वतःचा शोध त्याला सापडतो का? आत्मनिर्भर बनायचे त्याचे स्वप्न पूर्ण होते का? कोर्टाचे महत्त्व, वकिलीचा व्यवसाय याविषयी त्याच्या मनात असलेले समज-गैरसमज या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी 'कोर्ट कचहरी' ही मालिका बघायला हवी.

## कशी आहे सीरिज ?

टीव्हीएफच्या अरुणाभ कुमार यांनी निर्माण केलेली आणि रुचिर अरुण यांनी दिग्दर्शित केलेली कोर्ट कचहरी ही सीरिज कायदा आणि न्यायालयाच्या पार्श्वभूमीवरील मुलगा व वडील यांची कथा आहे. ही सीरिज एका लहान शहरातील जिल्हा न्यायालयातील कामकाज आणि गडबडीचे प्रसंग सादर करताना प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न करते. साडेपाच तासांची ही मालिका भारतातील लहान शहरांतील न्यायव्यवस्थेच्या जीवनावर भाष्य करते, जिथे खटले कमी आणि अहंकार, प्रभाव आणि गटबाजीचे राजकारण अधिक चालते. मात्र, वडील आणि मुलामधील तंटा फारशी प्रभावी बनलेली नाही. त्यांच्यातील संघर्ष कुठेही स्पष्टपणे दिसत नाही. कुमार आणि पुनीत बत्रा यांनी लिहिलेली ही मालिका बऱ्यापैकी मनोरंजक आहे. त्यात अनेक तीक्ष्ण उपहास असला, तरी सीरिज बघताना अनेकदा त्यात एक प्रकारची सुरक्षिततेची भावना दिसते. ही सीरिज ज्या व्यापक नैतिक प्रश्नांकडे बोट दाखवते खरी, परंतु त्या प्रश्नांना बगल देऊन पुढे सरकते. अर्थात, घटस्फोटाच्या केसमध्ये परम कायद्याच्या क्षेत्रात पहिले पाऊल टाकताना अतिशय वास्तविक पद्धतीने सादर केले आहे. न्यायालयातील कचेरींवरील उपहास, सामाजिक भाष्य आणि व्यक्तिगत नाट्यामध्ये याचे मिश्रण आहे. न्यायालयाच्या रूममधील प्रश्न, ओळख, वंश, तत्त्व आणि झुकलेली सामाजिक व्यवस्था या गोष्टी कथेला मदत करतात. या सीरिजमधील संघर्ष अनेकदा सरळ-साधे दाखवले आहेत, तर उपकथानके आणि काही मुद्दे मध्येच सोडून दिले आहेत. तांत्रिकदृष्ट्या सांगायचे तर संकलन चांगले करण्यात आले आहे व प्रॉडक्शन देखील चांगले केले आहे. तरीही, 'ग्राम चिकित्सालय' या सीरिजनंतर टीव्हीएफची आणखी एक कमकुवत सीरिज आहे असेच म्हणावे लागेल. यामध्ये काही वेगळे किंवा अभूतपूर्व असे काही नसले तरी, यातील नाट्य प्रेक्षकांना खिळवून ठेवते. सीरिजमधील प्रसंगांचे मिश्रण, कलाकारांचा उत्तम अभिनय आणि लहान शहरातील कायदेसंस्कृतीचे प्रामाणिक चित्रण यामुळे ही सीरिज बघायला मजा वाटते. अर्थात, सीरिजचे सार सांगायचे तर, कुठलेही ताण न देणारी ही सीरिज एकदा बघायला हरकत नाही.

**परीक्षण**

## अभिनय

ज्येष्ठ अभिनेता पवन मल्होत्रा यांनी अनुभवी व प्रतिष्ठित वकीलाची भूमिका उत्तम प्रकारे साकारली आहे. न्यायालयात आपल्या अस्सल पक्षाचे मांडणे असो, अन्य वकिलांसोबतचे व्यावसायिक संबंध असोत किंवा मुलासोबतचे वैचारिक मतभेद असोत, पण मनातून मुलाविषयीची काळजी आणि प्रेम त्यांनी अतिशय छान पद्धतीने सादर केले आहे. परमच्या भूमिकेतील अस्वस्थपणा, त्याचे विनोदी प्रसंग आणि आश्चर्य या सर्व भावना आशिष वर्मा यांनी चांगल्या पद्धतीने दाखवल्या आहेत. नैतिकता पाळणाऱ्या सहाय्यक वकील सूरज बैरिया या भूमिकेत पुनीत बत्रा आणि तिखट स्वभावाच्या महिला वकील अनुषा या भूमिकेत प्रियाशा भारद्वाज यांनी मालिकेत नवेपण आणले आहे. दोघांनीही आपापल्या भूमिका उत्कृष्टपणे साकारल्या आहेत.

**वेबसीरिज :** कोर्ट कचहरी
**दिग्दर्शन:** रुचिर अरुण
**कलाकार:** पवन मल्होत्रा, आशिष वर्मा, पुनीत बत्रा, प्रियांशा भारद्वाज, सुमली रवानीवाले
**ओटीटी प्लॅटफॉर्म:**सोनी लिव
**रेटिंग:** २.५ / ५

## आता तुझे वय झाले आहे...



**शाहरुख खान ज्याप्रमाणे रोमँटिक चित्रपटांसाठी ओळखला जातो, त्याचप्रमाणे हजरजबाबीपणा आणि विनोदबुध्दीसाठी ओळखला जातो. गेली ३२ वर्षे तो हिंदी सिनेसृष्टीवर राज्य करत आहे. 'जवान' या सिनेमातील अभिनयासाठी काही दिवसांपूर्वीच त्याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. शाहरुखने नुकतेच आपल्या एक्स अकाऊंटवर @AskSRK सेशन ठेवले होते, ज्यामध्ये त्याने आपल्या चाहत्यांच्या काही चांगल्या आणि काही विचित्र प्रश्नांची उत्तरे दिली. एका चाहत्याने शाहरुखला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल कसे वाटते ? हा प्रश्न विचारला, तेव्हा शाहरुखने उत्तर दिले की, ''वाह!!!!! देशाचा राजा असल्यासारखे मला वाटत आहे. हा सन्मान आणि जबाबदारी आहे की पुढे जाण्यासाठी आणखी मेहनत करणे कठीण झाले आहे.'' त्यावेळी एका युजरने लिहिले की, ''भाई, आता तुझे वय झाले आहे, दुसऱ्या मुलांना पुढे येऊ दे.'' यावर शाहरुखने मजेदार उत्तर दिले की, ''भाई, तुझ्या प्रश्नांमधील बालीशपणा जाईल. तेव्हा एखादा चांगला प्रश्न विचार. तोपर्यंत कृपया तूच सेवानिवृत्ती घे.'' एका चाहत्याने शाहरुखला त्याच्या मुलाच्या- आर्यनच्या सीरिजबद्दल देखील प्रश्न विचारला, तेव्हा शाहरुखने उत्तर दिले की, ''बेटा शो तयार होत आहे, बाप केवळ वाट बघत आहे.'' ट्वीटमध्ये शाहरुखने नेटफ्लिक्सला टॅग करत विचारले. की, ''तुम्ही काय करत आहात?'' यावर नेटफ्लिक्सने उत्तर दिले की, ''मुलाचा टीझर पोस्ट करण्यापूर्वी वडिलांची परवानगी हवी होती. फर्स्ट लूक उद्या येत आहे.''**

---

हेल्दी Me

# त्वचारोगांचा पावसाळा

पावसाळ्यात त्वचेला होणाऱ्या ॲलर्जीमध्ये त्वचेवर पुरळ उठणे, खाज येणे, लालसरपणा यांसारखी लक्षणे दिसतात. ही ॲलर्जी वातावरणातील बुरशी, परागकण, धूळ, कीटक आणि फुलांमधील घटकांमुळे होऊ शकते. तसेच सूक्ष्मजीव, पाळीव प्राण्यांच्या त्वचेवरील सूक्ष्म तुकडे हे देखील त्वचेला ॲलर्जिक बनवतात. अस्थमा, एक्झिमा यांसारख्या समस्यांनी ग्रस्त असलेल्या व्यक्तींना पावसाळ्यात त्वचेसंबंधी ॲलर्जीचा धोका अधिक असतो.

ॲलर्जीमुळे निर्माण होणारी खाज त्वचेच्या बाह्य थराला इजा पोहोचवते. यामुळे बुरशी आणि जीवाणूंना त्वचेत शिरकाव करण्याचा मार्ग खुला होतो. या ऋतूमध्ये कपडे व पादत्राणे वारंवार ओले होतात. ते शरीरावर अधिक वेळ राहिल्यास त्वचेला त्रास होतो. कापडांमध्ये असलेल्या रसायनांमुळे ते ओले झाल्यानंतर त्वचेवर ॲलर्जी होते.

बऱ्याच जणांना यामुळे त्वचेवर खाज सुटते, काहींना लालसर पुरळ उठते. रेनकोट, रबरी चप्पल, ग्लोव्हज हे सर्व वस्त्रप्रकार त्वचेशी थेट संपर्कात आल्यास बुरशीजन्य संसर्ग होण्याची शक्यता असते. हातांच्या कोपरांना, गुडघ्यांच्या मागील भागाला किंवा सामान्यतः शरीराचा जो भाग स्वच्छतेपासून दुर्लक्षित राहतो त्या भागामध्ये ॲलर्जी किंवा जीवाणूसंसर्ग होण्याची शक्यता अधिक असते.




या ऋतूमध्ये वातावरणात बुरशी (मोल्ड्स) भरभरून वाढते. ओलसर भिंती, पडदे, जुन्या वस्तू अशा ठिकाणी बुरशी तयार होते. ही बुरशी केवळ त्वचेलाच त्रास देत नाही तर ॲलर्जिक राइनायटिस आणि ॲलर्जिक अस्थमाही निर्माण करू शकते. पायाच्या बोटांमध्ये चट्टे दिसणे किंवा ॲथलिट्स फूट हा सर्रास दिसणारा बुरशीजन्य संसर्ग आहे. यामध्ये बऱ्याचदा विशिष्ट भागातील त्वचेची खूप खाज सुटणे आणि जळजळ होणे अशी लक्षणे दिसतात. पावसाळ्यात ज्यांना घाम येतो त्यांनी अधिक काळजी घेण्याची गरज असते. कारण दमटपणा असल्यामुळे तो लवकर वाळत नाही. त्यामुळे त्वचेच्या अल्कलिनतेमध्ये वाढ होऊन बुरशी लवकर वाढते. वेळेवर लक्ष न दिल्यास इतर व्यक्तींनाही याचा संसर्ग होऊ शकतो.

फॉलिक्युलायटिस ही केसांच्या मुळाशी होणारी जीवाणूजन्य संसर्गजन्य स्थिती आहे. या आजारात त्वचेमध्ये लहान फोडसदृश गाठ तयार होते, जी दिसताना पुरळांसारखी वाटते, पण ती खूप वेदनादायक असते. पाठीवर, कपाळावर, गालांवर याचा जास्त परिणाम होतो. पावसाळ्यात बॅक्टेरिया वाढण्यास पोषक वातावरण असल्यामुळे इंपिटिगोसारख्या त्वचाविकारांचाही प्रादुर्भाव होतो.


या ऋतूमध्ये त्वचेसाठी काही विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः मधुमेह असलेल्या रुग्णांनी आपल्या त्वचेसंबंधी लक्षणांकडे जास्त लक्ष द्यावे. पावसात भिजल्यावर त्वचा कोरडी करणे, कपडे लगेच बदलणे, स्वच्छता राखणे आणि सॅनिटरी वस्त्र वापरणे या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत.

सार्वजनिक ठिकाणी भिजलेली चप्पल किंवा मोजे पुन्हा न वापरणे, घरात ओलसर जागा टाळणे आणि टॉवेल, रुमाल, बिछाना इतरांपासून वेगळे ठेवणे ही प्राथमिक काळजी घेतली पाहिजे. आपले टॉवेल आणि इतर वैयक्तिक वस्तू वेगळ्या ठेवा. पोहायला जात असाल तर पोहल्यावर ॲन्टिसेप्टिक वापरून आंघोळ करा. तसेच मनगटांवर, मांडींवर आणि पायाच्या बोटांमध्ये बुरशीविरोधी पावडर लावा. ॲक्झिमा होऊ नये म्हणून पाळीव प्राणी बेडरूममध्ये येऊ देऊ नका. धूळ आणि सूक्ष्मजीवांपासून बचाव करण्यासाठी गादी आणि उशा कव्हर करा. या दिवसांत जमिनीवरचे कार्पेट काढून टाका जेणेकरून जमीन कोरडी राहील.

## हेल्दी टिप्स



सकाळी उठल्या उठल्या लिंबाचा रस, मध आणि गरम पाणी असे मिश्रण घेतल्यास ॲसिडीटीची तक्रार कमी होते. जर लिंबू पाणी घ्यायचे नसेल तर रात्री झोपण्यापूर्वी ७-८ मनुके पाण्यात भिजत घालावेत. रात्रभर भिजलेले मनुके सकाळी रिकाम्यापोटी घ्यावेत. मनुक्यांमध्ये शरीरातील ॲसिडच्या प्रमाणात संतुलन निर्माण करण्याचे सामर्थ्य असते.



ताजे आले घ्यावे त्याचे बारीक तुकडे करावेत आणि ते खडे मीठात आणि लिंबाच्या रसात मिसळावेत. हे मिश्रण सूर्यप्रकाशात ठेवावे. सूर्यप्रकाशात हे मिश्रण कोरडे होते. त्यानंतर ते बाटलीत भरून ठेवावे. यातील एक तुकडा दररोज जेवणानंतर खावा. यामुळे आपली पचनशक्ती सुधारण्यास मदत होते. तसेच पोटातील गॅसेस कमी होतात आणि पोट दुखणेही थांबते.

## संजीवनी डिजिटल इनहेलरची

**नवं काही**

जर्नल ऑफ ॲलर्जी अँड क्लिनिकल इम्यूनोलॉजी: इन प्रॅक्टिस' मध्ये प्रकाशित झालेल्या एका व्यापक विश्लेषणानुसार, डिजिटल इनहेलरचा वापर केल्यास अस्थमाचे नियंत्रण अधिक चांगल्या प्रकारे साधले जाऊ शकते, असा दावा करण्यात आला आहे. विशेषतः नियमितपणे औषध न घेणाऱ्या किंवा योग्य पद्धतीने इनहेलर न वापरणाऱ्या रुग्णांमध्ये हा प्रभाव अधिक प्रमाणात दिसून आला आहे. यामध्ये म्हटले आहे की, डिजिटल इनहेलर अस्थमाचे गंभीर झटके येण्याचा धोका कमी करू शकतात.

**डिजिटल इनहेलर म्हणजे काय?**

डिजिटल इनहेलर हे सामान्य इनहेलरप्रमाणेच औषध देतात, पण यामध्ये सेन्सर बसवलेले असतात. ते रुग्णाच्या औषध घेण्याच्या वेळेची नोंद ठेवतात. तसेच इनहेलर कसा वापरतो याची माहिती देतात. योग्य तंत्र वापरले की नाही, यावर फीडबॅक देतात. यामुळे रुग्णांचे औषधांची वेळ पाळण्याचे प्रमाण वाढते आणि चुकीच्या पद्धतीने इनहेलर वापरण्याची शक्यता कमी होते.

डॉ. लिओनार्डो ओलोगुंडुडू (मॅकमास्टर विद्यापीठ, ओन्टारिओ, कॅनडा) आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यासाठी १२ चाचण्यांचे पुनरावलोकन केले. या चाचण्यांमध्ये २,४८३ रुग्ण सहभागी होते. त्यातील ४४.३% रुग्णांमध्ये अस्थमा नियंत्रण चाचणीत तीन किंवा अधिक गुणांची वाढ दिसून आली, तर नियंत्रण गटात ही संख्या ३९.८% होती. अस्थमा रुग्णांसाठी इनहेलरचा प्रत्येक डोस योग्य पद्धतीने फुफ्फुसांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. डिजिटल इनहेलरमुळे हे साधले जाते. या स्मार्ट इनहेलरचा डेटा मोबाईल ॲपमध्ये जमा होतो. त्यामुळे डॉक्टरांना तो पाठवता येतो आणि पुढील उपचार घेता येतात. औषधात बदल, डोस सुधारणा किंवा इतर उपाययोजना अधिक योग्यपणे करता येतात. डिजिटल इनहेलर




अनेकदा बाह्य वातावरणातील बदल (हवा, प्रदूषण) याचेही अलर्ट देतात. ज्यांना प्रदूषण, धूळ किंवा हवामान बदलामुळे त्रास होतो, त्यांनी ही सुविधा वापरावी. थोडक्यात, डिजिटल इनहेलरच्या माध्यमातून अस्थमा नियंत्रणासाठी आवश्यक असणाऱ्या पथ्याचे आणि शिस्तीचे पालन करण्यास मदत होते. ज्यांना वारंवार झटके येतात त्यांच्यासाठी ही एक आधुनिक आणि सुरक्षित उपाययोजना ठरू शकते.

**(डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार करू नयेत.)**

## बिंज ईटिंग म्हणजे काय?

बिंज ईटिंग म्हणजेच एका बैठकीत खूप अन्न खाण्याची प्रवृत्ती. आहारतज्ज्ञांच्या मते, ही सवय शारीरिक भुकेपेक्षा मनाच्या ताणाशी जास्त जोडलेली आहे. एखाद्या सणावाराच्या दिवशी जास्त खाणे म्हणजे बिंज ईटिंग नव्हे. नियमित स्वरुपात, भावनिक उद्देशाने जर भूक नसतानाही आहाराचे सेवन केले जात असेल आणि त्यानंतर अपराधीपणा, लाज, नियंत्रण गमावल्याची भावना जाणवत असेल तर सदर व्यक्तीला बिंज ईटिंगची समस्या जडली आहे, असे समजावे. काही लोक परिपूर्ण जेवण केल्यानंतरही पुन्हा काहीतरी खाण्याकडे वळतात. ही भूक शरीराची नसून मनाची असते. तणाव, दुःख, अपयश, हतबलता किंवा परिणाम दिसत नसल्याने होणारी निराशा ही बिंज ईटिंगम ागील प्रमुख कारणं असतात. यावेळी डोपामिन (आनंद निर्माण करणारं मेंदूतील रसायन) तत्काळ हवं असतं आणि ते मिळवण्यासाठी साखरयुक्त, तेलकट, चविष्ट अन्न खावंसं वाटतं. पण त्यानंतर येणारा अपराधीपणा हा आत्मविश्वास कमी करण्यास कारणीभूत ठरतो.



भावनिक चढउतारांच्या काळात किंवा नकारात्मक अवस्थेत हे वर्तन अधिक होते. कारण या मनोवस्थेत आत्मनियंत्रण हरवलेलं असतं. अशा वेळी अन्न हे कोपिंग मेकॅनिझम किंवा भावनिक सांत्वन करणारं साधन ठरतं. पण हेच अन्न पुढे शरीरासाठी नुकसानकारक ठरू शकतं. यावरुन वजन कमी करणं म्हणजे फक्त बाह्य बदल नाही, तर अंतर्मनातील आणि शरीरातील अनेक सूक्ष्म बदलांचं एक परिणाम आहे, हे लक्षात येईल.


बिंज ईटिंग म्हणजे केवळ अन्नसेवनावरचं नियंत्रण सुटणे नाही, तर भावनांवरचा तुटलेला ताबा असतो. सबब आत्मनिरीक्षण, संयम आणि आपण स्वतःसाठी हीलिंगच्या प्रक्रियेत आहोत याबाबतचा आत्मविश्वास सदोदित असणे गरजेचे असते.

## वेटलॉससाठी औषध शोधताय?




डेन्मार्कमधील औषध कंपनी नोवो नॉर्डिस्कने भारतात वजन कमी करणारं औषध लाँच केलं आहे. या औषधाचं नाव 'वेगोवी' असून ते एक इंजेक्टेबल सेमाग्लुटाइड आहे. हे भारतातील पहिले आणि एकमेव वजनावरील औषध आहे जे दीर्घकाळासाठी वजनाचं व्यवस्थापन करतं आणि मेजर ॲडवर्स कार्डियोवास्कुलर इवेंट्सचा धोका कमी करतं. वास्तविक, हे पेनसारखं उपकरण असून ते ०.२५ मिलीग्रॅम, ०.५ मिलीग्रॅम, १ मिलीग्रॅम, १.७ मिलीग्रॅम आणि २.४ मिलीगॅम अशा वेगवेगळ्या डोसमध्ये उपलब्ध आहे. केवळ प्रिस्क्रिप्शनवर हे औषध मिळणार आहे. लठ्ठपणा किंवा जास्त वजनाने ग्रस्त असलेल्या लाखो भारतीयांना हा दिलासा असल्याचा कंपनीचा दावा आहे. जास्त वजन आणि लठ्ठपणा असलेल्या लोकसंख्येच्या बाबतीत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१३४६



**आडवे शब्द –**

१. नुकसानदायक, बाधक ३. गाशा, सर्व चीजवस्तू ८. संपूर्ण ११. प्रेमात पडलेला १२. मदत १३. गौरीच्या नैवेद्यातील दोन प्रमुख पदार्थ १५. स्तुतिपाठक १६. बिचारा १८. चोप, मार १९. जंगली रेडा २०. सगळे खाऊन टाकणे २२. मदतीसाठी असलेला कर्मचारी २४. तंतू, वायर २५. हस्त, बाहू २६. वाम २७. मतभेद २८. अर्भक, लहान मूल २९. सर्वात धाकटे अपत्य ३०. खात्री ३२. गोंगाट ३५. फुकट जाणे ३६. टांग, पाय ३८. सर्व, तमाम ३९. पाप धुवून काढणे, प्रायश्चित्त घेणे ४२. लायकी, अर्हता ४४. घळ ४५. वायू ४७. तळलेले पदार्थ कढईतून काढण्याचे साधन ४८. तोटा ४९. जून, खरखरीत ५१. बस्तान, स्थैर्य ५३. कंबरेत वाकलेला ५५. तीव्र मतभेद ५७. केस ५९. रोटीचा नाजूक प्रकार ६०. मुस्लिम साधू ६२. तीन रस्ते एकत्र मिळतात ते ठिकाण ६३. कागद, प्लायवुड वगैरे घट्ट चिकटवण्याचे एक साधन ६६. प्रामाणिक ६८. स्त्री, ललना ७०. तमाशा, लोकनाट्य ७३. योग्य, उचित ७४. तनय ७५. सततची बडबड ७७अ. मोठा ७८. वठणीवर येणे, वागणे सुधारणे ७९. खेप, क्रम ८०. अनेक भाडेकरू असलेली मोठी इमारत ८१. पेरणीची कामे ८२. रमलेला ८३. वैज्ञानिक ८५. पुत्री, तनया ८७. संकोची स्वभावाचा ८९. जगाची रीत ९३. दासी ९५. वृद्ध पुरुष ९७. लज्जत, मौज ९८. लहान मुलांमध्ये कानांच्या खालच्या बाजूला गालांवर येणारी वेदनादायक सूज ९९. नोकरीची उपलब्धता १००. मध्ययुगीन काळात सविस्तर लिहून ठेवलेल्या ऐतिहासिक घडामोडी १०२. क्षय, उतरती कळा १०३. थेट १०४. बाकीची माणसे १०५. आधार १०६. अडवणे, रोखणे १०७. मिठाईतील वडी

**उभे शब्द –**

१. महिना २. हिंसाचार ३. बाहेरचे ४. नादुरुस्ती ५. स्तोत्र ६. जंगल ७. फुलझाडांचा वाफा ९. खेळती हवा नसलेली जागा १०. लुबाडणे ११. ऋषीचे घर १२. कमळ १४. पाणी भरण्याचे मोठे भांडे १५. हमाल १७. इच्छा १८. बलशाली २०. मनाविरुद्ध एखाद्याच्या मागे जावे लागणे २१. सुळका २३. एजंट २४. वागण्याला शिस्त, धरबंद २५. वर्तुळ, रिंगण २९. शिखा ३१. प्रिय व्यक्ती एकत्र येणे ३२. तांब्या ३३. फणसाचा प्रकार ३४. शासन ३७. चाकोरीबद्ध वागणारा ३८. आश्रय ४०. खग, विहग ४१. रामाचा एक भाऊ ४२. अंत, मर्यादा ४३. राजवाडा ४६. लाल घेवडा ५०. पाजी, लुच्चा ५२. मळलेले ५३. ओसरी, सोपा ५४. बाष्प ५६. अंगरखा ५८. सोन्याचे चपटे तुकडे गुंफलेला अनेकपदरी हार ५९. संतप्त अवतार ६१. करुणा ६४. सारखा, समान ६५. एकाच घराण्याकडे सत्ता असणे ६६. डोळे ६७. शपथ ६९. गोठलेले पाणी ७१. अतिशय लाडकी व्यक्ती ७२. अस्वस्थपणे हेलपाटे घालणे ७४. बारीक फोड ७५. पुष्टी ७६. पीडा ७७. बुरशी ७९. लेंगा ८४. पाणी ८६. मंजुषा ८८. वार्धक्य ९०. निर्धन ९१. लोभी ९२. सज्जन ९३. पदच्युती ९४. अस्वच्छ, मळकट ९६. मोडणे, मोडतोड ९७. वाढ खुंटलेले (झाड) ९८. तक्रार, फिर्याद ९९. प्रत्येक दिवशी १०१. पिकांचे टॉनिक •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३४५चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. अवगाहन ७. प्रलोभन १०. जंग ११. खोळंबा १३. पाव १४. खर्डेघाशी १६. भूछत्री १८. दीपक २०. मारा २१. रडगाणे २३. तोडा २६. जावईशोध २९. मान ३०. मढ ३१. मावंदे ३३. वडवानल ३६. रसभरित ३८. कालिंदी ४०. बोळ ४१. काकवी ४३. विपुलता ४५. अनीन ४७. बूड ४८. नकील ४९. भाष्य ५०. बीज ५१. यमल ५२. दशा ५४. द्वाड ५५. पत ५७. तिजा ६०. अंमलदार ६३. गळू ६४. मस्ती ६५. हलाहल ६६. उलगडा ६८. पैदा ७०. आचार ७२. शंका ७३. बाजारगप ७४. आमचूर ७६. वाचा ७७. डाकू ७९. अंगरखा ८०. अग्र ८१. रसातळ ८४. समंध ८६. नाव ८८. वाहक ९०. लेखन ९१. मित ९३. रसा ९५. जाहीर ९८. मामुली ९९. परिचय १००. वीरांगना १०२. जयविजय १०४. वामा १०५. दौलत १०६. मखखी १०७. कुरापत ११०. झणझणीत १११. नखरेल ११२. चित्रा ११३. करडई

**उभे शब्द :** १. आळंदी ३. वपा ४. गाव ५. नखरा ६. माघार ८. लोढणे ९. न भूतो न भविष्यती १०. जंत्री १२. बापजादे १५. शीड १७. छडा १९. कव २०. माधव २२. गाशा २४. कढ २५. मामा २७. ईडलिंबू २८. टवाळ २९. मास ३०. मतलबी ३२. वंदनीय ३४. डबोले ३५. लकाकी ३६. रवी ३७. रिपु ३९. दीडदमडीचा ४२. कलप ४४. ताजवा ४६. नमकहराम ४८. नड ५३. शाल ५४. द्वार ५६. तगडा ५८. जामदारखाना ५९. सहजी ६१. दाई ६२. फोल ६६. उकाडा ६७. गम्य ६८. पैजार ६९. थप्पड ७०. आरसा ७१. रवाळ ७३. बाग ७४. आग्रह ७५. चूर ७८. कूस ७९. अंध ८०. अवाजवी ८२. तथा ८३. पखवाज ८५. मंत्रमुग्ध ८७. वरचष्मा ८९. कजाग ९०. तपमापक ९४. साय ९६. हीना ९७. आयतन १०१. रांजण १०२. जल १०३. यमल १०४. वारा १०५. दौत १०७. कुत्रा १०८. तर १०९. रुई

# अकोला व अमरावतीत ढगफुटीसदृश पाऊस! जनजीवन विस्कळीत

पान ८ वरून

रस्ते जलमय झाले. अमरावती-यवतमाळ जिल्ह्यांतील पावसामुळे वर्धा नदीची पाणीपातळी वाढून घुग्गूस-गडचंदूर मार्गावरील भोयगाव पूल पाण्याखाली गेला. खबरदारीचा उपाय म्हणून मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला.

वाशीम जिल्ह्यात अडाण नदीला पूर आला. अडाण प्रकल्पामध्ये ७३.३९ टक्के पाणीसाठा झाला. पाण्याची आवक वाढत असल्याने अडाण प्रकल्पाचे ५ दरवाजे प्रत्येकी ७० सेंमीने उघडण्यात आले. तर जिल्ह्यातील १४ मंडळात अतिवृष्टी झाली. कोंडाळा झामरे परिसरातील अचानक आलेल्या पुरसदृश पाण्याच्या लोंढ्यात तब्बल ४० जनावरे वाहून गेली. यवतमाळ जिल्ह्यामध्ये काल सकाळपासूनच संततधार पावसाने थैमान घातले होते. अशात उमरखेड तालुक्यातील चातारी या गावात १३० तर सावळेश्वर गावात २० आणि शिवाजीनगर येथील ८० घरात पाणी शिरले. जवळपास ४५० पेक्षा अधिक घरांची पडझड आणि नदी नाल्यांना पूर आला आहे. चांदूर बाजार तालुक्यात आणि तिवसात अनेक गावात पाणी शिरले.

धुळे शहरातील अनेक सखल भागांत तसेच धुळे पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या चहूबाजूंनी पाणी मोठ्या प्रमाणात साचले. जळगावच्या धरणगाव शहरातील धरणी परिसरात सलग दुसऱ्या दिवशी धरणी नाल्याला प्रचंड पूर आल्याने परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले. पुराचे पाणी दुकाने व घरांमध्ये शिरले. परिणामी धरणी परिसर आणि जैन गल्ली पूर्णपणे जलमय झाला.

नागपूर जिल्ह्याच्या भिवापूर तालुक्यातील नांद नदीत दुचाकीस्वार वाहून गेला. भंडाऱ्याच्या लाखांदूर तालुक्यात दुपारनंतर विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. यात लाखांदूर तालुक्यातील चपराळ पहाडीजवळ अंगावर वीज कोसळल्याने मनोहर कुंभले (६८) यांचा मृत्यू झाला.

बीडमध्ये मागील दोन दिवसांपासून दमदार पावसाने हजेरी लावली. या पावसाने राजुरी गावातून वाहणारी डोमरी नदी दुथडी भरून वाहत आहे. धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील घोडकी परीसरात मागील तीन दिवसात झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जात या नुकसानीची पाहणी केली.नांदेड, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यात झालेल्या मोठ्या पावसामुळे नांदेड शहरा जवळून वाहणाऱ्या आसना नदीला मोठा पूर आला. आसना नदीच्या पुराचे पाणी शेतीत शिरल्याने पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.पैनगंगा, कयाधू, आसना नदीने धोक्याची पातळी ओलांडली. माहूर तालुक्यातील पडसा पुलावर पैनगंगा नदीच्या पुरात दोन निलगाय वाहून गेल्या. लातूर शहरासह अंबाजोगाई, कळंबला पाणीपुरवठा करणारे मांजरा धरण ९५ टक्के भरले.

# मुंबईतील कबुतरखान्यांबाबत हरकती व सूचनांचे आवाहन

पान १ वरून

कबुतरांना खाद्य पुरवावे की नाही याबाबतच्या हरकती व सूचना suggestions@mcgm.gov.in या ईमेल आयडीवर उद्यापासून म्हणजेच १८ ऑगस्ट २०२५ ते शुक्रवार २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत पाठवाव्यात. ज्यांना या सूचना वा हरकती प्रत्यक्ष लेखी स्वरुपात करायच्या असतील त्यांनी कार्यकारी आरोग्य अधिकारी, तिसरा मजला, एफ दक्षिण विभाग कार्यालय इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परळ येथे २९ ऑगस्टपर्यंत कार्यालयीन वेळेत द्याव्यात.

# जम्मू - काश्मीरच्या कठुआत भूस्खलन!

पान ८ वरून

उझ नदीसह इतर नद्यांची पाणीपातळी वाढल्याने प्रशासनाने नागरिकांना सर्तक राहण्याचे आवाहन केले आहे. या दुर्घटनेचा समाजमाध्यमांवर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये अनेक कुडाची घरे कोसळलेली दिसतात.

मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी मृतांच्या कुटुंबीयांना आणि घरांचे नुकसान झालेल्या नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी व राज्य आपत्ती निवारण निधीतून तत्काळ अनुदान जाहीर केले. यानुसार मृतांच्या कुटुंबियांना २ लाख रुपये, गंभीर जखमींसाठी १ लाख रुपये, किरकोळ जखमींसाठी ५० हजार रुपये तर जी घरे पूर्णपणे नष्ट झाली आहेत त्या घरांसाठी १ लाख रुपये, गंभीर नुकसान झालेल्या घरांसाठी ५० हजार आणि अंशतः नुकसान झालेल्या घरांसाठी २५ रुपये निधी मंजूर केला आहे. पोलीस व प्रशासनाने डोंगराळ भागातील लोकांना घरातच राहण्याचा इशारा दिला आहे. ढगफुटीमुळे जम्मू-पठानकोट रेल्वे मार्गावर वाहतूक विस्कळीत झाल्याने काही गाड्या रद्द केल्या तर मंडी मनाली महामार्ग बंद केला आहे. हवामान विभागाने १९ ऑगस्टपर्यंत जम्मू विभागातील जम्मू, रियासी, उधमपूर, राजौरी, पूंछ, सांबा व कठुआ येथे जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. डोडा, किश्तवाड व रामबन येथेही मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे.

# राष्ट्रपती-राज्यपालांना कालमर्यादा देणे हा अधिकारात हस्तक्षेप!

पान १ वरून

केलेल्या दिरंगाईसंदर्भात दाखल केलेल्या या प्रतिज्ञापत्रात सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी युक्तिवाद केला की, राज्यपाल व राष्ट्रपती यांनी त्यांच्यासमोर ठेवलेल्या विधेयकांवर तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा, असा आदेश ८ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. मात्र याला केंद्र सरकारने आक्षेप घेत म्हटले की, वेळमर्यादा दिल्याने संविधानकर्त्यांना अपेक्षित असलेले नाजूक संतुलन ढासळेल. एखाद्या घटकाने निष्क्रियता केली किंवा त्रुटी ठेवली तर त्यामुळे दुसऱ्या घटकाला संविधानाने न दिलेले अधिकार द्यायचे हे योग्य नाही. कलम १४२ हे सर्वोच्च न्यायालयाला पूर्ण न्याय करण्याचे अधिकार देते, ते प्रक्रियात्मक स्वरूपाचे असून, उच्च घटनात्मक संस्थांना सोपवलेल्या कार्यांचे नव्याने वाटप करण्यासाठी वापरले जाऊ शकत नाही. कलम २०० आणि २०१ राज्यपाल आणि राष्ट्रपतींना उपलब्ध असलेल्या पर्यायांवर नियंत्रण ठेवतात, त्यात मुद्दाम वेळेची कोणतीही मर्यादा नाही. ज्या ठिकाणी संविधानाने वेळेची मर्यादा ठेवायची होती, तिथे तसे स्पष्टपणे नमूद केले आहे, पण जिथे जाणूनबुजून लवचिकता ठेवली आहे, तिथे न्यायालयाने स्वतःहून वेळ मर्यादा लादू नये. कठोर वेळेच्या मर्यादा घालण्याचा कोणताही प्रयत्न घटनाकारांच्या उद्देशाला निष्फळ ठरवेल. सर्वोच्च न्यायालयाने निश्चित कालावधी लादल्याने निर्माण झालेली घटनात्मक रचना मोडून पडेल आणि कायद्याचे राज्य संपुष्टात येईल.

मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या नेतृत्वाखालील पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने १९ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या कालावधीत या प्रकरणाची सुनावणी निश्चित केली आहे.

# राहुल गांधींना उत्तर! आयोगाची पत्रकार परिषद

पान १ वरून

आढळलेली नाही. महाराष्ट्रात जे कोर्टात गेले त्यांना पुरावा देता आला नाही. त्यामुळे आता आरोप करण्यामागील हेतू काय आहे, हे जनतेला समजते. लोकसभा निवडणुकीच्या प्रक्रियेत एक कोटींहून अधिक कर्मचारी, १० लाखांहून अधिक बूथ पातळीचे एजंट, २० लाखांहून अधिक मतदार एजंट काम करतात. ही एक विकेंद्रित प्रक्रिया आहे. इतक्या लोकांसमोर, इतक्या पारदर्शक प्रक्रियेत कोणीही मते चोरू शकतो का?

ज्ञानेश कुमार म्हणाले की, मतदार यादीचा दरवर्षी सखोल आढावा घेतला जात असे. परंतु वीस वर्षे असा सखोल आढावा घेण्यात आलेला नव्हता. एखाद्या मतदाराचे नाव गावात असेल आणि शहरातही असेल, तर ते आम्ही कापू शकत नाही. एसआयआर म्हणजे सखोल तपास झाला, तरच याचा शोध लागेल म्हणून बिहारमध्ये ही प्रक्रिया करीत आहोत. आम्ही हे घाईने केलेले नाही. निवडणुकीच्या आधी ते करायला हवे, यासाठी जुलै महिन्यात बिहार राज्यात निवडणुकीच्या आधी पडताळणी सुरू केली. पावसाळा असताना ही पडताळणी का केली, असा आम्हाला प्रश्न विचारला जातो. परंतु २००३ मध्येही जुलै महिन्यातच अशी पडताळणी झाली होती. एसआयआरची घाई का आहे? असा प्रश्न विचारणाऱ्यांना मी सांगेन की, लोकप्रतिनिधीत्व कायदा म्हणतो की, प्रत्येक निवडणुकीपूर्वी तुम्हाला मतदार यादी दुरुस्त करावी लागेल. ही निवडणूक आयोगाची कायदेशीर जबाबदारी आहे.

मतदारयादीतील त्रुटी दूर करण्याच्या प्रक्रियेबाबत माहिती देताना ज्ञानेश कुमार म्हणाले की, याबाबत तक्रार करणारा तक्रारदार त्या मतदारसंघाचा मतदार नसेल, तर निवडणूक नोंदणी नियम, नियम क्रमांक २०, उपकलम (३), उपकलम (ब) हा एकच पर्याय आहे. तुम्ही साक्षीदार म्हणून तुमची तक्रार दाखल करू शकता आणि तुम्हाला निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांसमोर आणि ज्या व्यक्तीविरुद्ध तुम्ही तक्रार केली आहे त्याच्यासमोर ती शपथ घ्यावी लागेल. परंतु नुसतेच आरोप करत असाल, तर ते राजकीय आहे. काहींचे घर क्रमांक शून्य आहे, यावरून आरोप करण्यात आले. मग आम्ही तिथे राहतो, असे सांगणारे पुढे आले. त्यांना ग्रामपंचायतीने घर क्रमांक दिला नव्हता. शहरात अनेक जण अनधिकृत घरात राहतात. त्यामुळे त्यांना घर क्रमांक नसतो. रस्त्यावर राहणाऱ्यांचा घर क्रमांक नसतो. त्यांचा घर क्रमांक शून्य असतो. असे शून्य क्रमांक असणारे १,८०,००० मतदार आहेत. मतदार होण्यासाठी पत्ता महत्त्वाचा नाही, तर नागरिकत्व आणि १८ वर्षांचे असणे महत्त्वाचे असते. एखादा नागरिक दोन ठिकाणी मतदान करत असेल, तर तो गुन्हा आहे. असा गुन्हा कुणी करत असेल, तर त्याचा पुरावा द्यावा लागतो. पुरावा दिल्याशिवाय एकाही मतदाराचे नाव मतदार यादीतून कमी केले जाणार नाही. एसआयआरमधून वगळलेल्या ६५ लाख मतदारांची यादी न्यायालयाने फटकारल्यानंतरच का दिली या प्रश्नावर ज्ञानेशकुमार म्हणाले की, २०१९ मध्ये न्यायालयाने असा निकाल दिला होता की, या माहितीचा गैरवापर होऊ शकतो. शिवाय मशीन रिडेबल माहितीत कुणीही फेरफार करू शकतो. त्यामुळेच या मतदारयादीतील मतदारांचे फोटो छोट्या आकारात आहेत.

महाराष्ट्रातील निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा आरोप केला जात आहे. त्याबद्दल बोलताना ज्ञानेश कुमार म्हणाले की, याची आधी तक्रार का केली नाही? निकाल लागल्यावर तक्रार का केली? कोर्टात पुरावा का दिला नाही? मतदानाच्या अखेरच्या तासात मतदार कसे वाढले, असा सवाल केला जात आहे. परंतु या बोलण्याला काही अर्थ नाही. सतत प्रश्न उपस्थित केल्याने खोट्याचे खरे होत नाही. जे बिनबुडाचे आरोप करत आहेत त्यांनी माफी मागावी.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या पत्रकार परिषदेवर टीका केली. ते म्हणाले की, आज निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेतली. ते पहिल्यांदा सूत्रांद्वारे नाही, तर थेट बोलले. पण राहुल गांधींनी उपस्थित केलेल्या कोणत्याही प्रश्नाला मुख्य निवडणूक आयुक्तांनी नीट उत्तर दिले नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या १४ ऑगस्टच्या आदेशाचे निवडणूक आयोग पूर्ण पालन करणार का? घटनात्मकदृष्ट्या त्यांचे ते कर्तव्य आहे. देश वाट पाहत आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांनी राहुल गांधींना दिलेल्या धमक्यांबद्दल, फक्त एवढेच सांगायचे आहे की, राहुल यांनी आयोगाच्याच आकडेवारीतून समोर आलेली तथ्ये मांडली होती. निवडणूक आयोग केवळ त्याच्या अक्षमतेसाठीच नव्हे तर त्याच्या उघड पक्षपातीपणासाठीदेखील पूर्णपणे उघड पडला.

# भुता हायस्कूलमध्ये गोकुळाष्टमीचा जल्लोष

■ मुंबई



**अंधेरी** पूर्वमधील श्री नागरदास धारसी भुता हायस्कूलमध्ये १४ ऑगस्ट २०२५ रोजी गोकुळाष्टमीच्या निमित्ताने कृष्ण पूजन व दहीहंडीचा भव्य कार्यक्रम विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात, ढोल-ताशाच्या गजरात साजरा केला.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीकृष्ण पूजन व आरतीने झाली. या क्षणी गोविंदा आला रे अशा जयघोषात संपूर्ण वातावरण दुमदुमून गेले. सर्व उपस्थितांनी टाळ्यांचा गजर करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. दहीहंडीचा प्रसाद सर्वांना वाटण्यात आला. कार्यक्रमाला शाळेचे मॅनेजिंग ट्रस्टी कमलेशजी भुता, ट्रस्टी देवांगीजी भुता, शुभेंदूजी भुता आणि तेजश्रीजी भुता यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या सांस्कृतिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना भारतीय परंपरा व संस्कृतीची जाणीव झाली असून, त्यांच्या सर्वांगीण विकासालाही चालना मिळाल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

# प्रशिक्षणादरम्यान अपंगत्व आलेल्या उमेदवारांची सुप्रीम कोर्टाकडून दखल

■ नवी दिल्ली

**नॅशनल** डिफेन्स अ‍ॅकॅडमी (एनडीए) आणि इंडियन मिलिटरी अ‍ॅकॅडमी (आयएमए) येथे प्रशिक्षणादरम्यान अपघातग्रस्त होऊन अपंगत्व आलेल्या उमेदवारांना माजी सैनिकांचा दर्जा व वैद्यकीय सुविधा नाकारल्याच्या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल (सुमोटो) घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठासमोर १९ ऑगस्ट रोजी या प्रकरणाची सुनावणी होणार असल्याची माहिती आहे.

१९८५ पासून सुमारे ५०० उमेदवारांना प्रशिक्षणादरम्यान वैद्यकीय कारणास्तव बाहेर काढले आहे. त्यांना केवळ ४० हजार रुपयांपर्यंतची अंशदायी (एक्स-ग्रेशिया) रक्कम दिली जाते. मात्र त्यांना माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजनेसारख्या महत्त्वपूर्ण वैद्यकीय लाभांपासून वंचित ठेवले जाते. २०२१ ते जुलै २०२५ दरम्यान एनडीएमधून २० कॅडेट्सना वैद्यकीय कारणांनी बाहेर काढले. प्रशिक्षित होण्याआधी झालेल्या अपघातामुळे त्यांना माजी सैनिकांचा दर्जा नाकारला जातो. तो सेवा करताना अपंगत्व आलेल्या सैनिकांना दिला जातो. सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे या प्रशिक्षणार्थींना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

# साताऱ्याचे प्रवीण वायदंडेंना अरुणाचल सीमेवर वीरमरण

■ सातारा

**साताऱ्याच्या** कोरेगाव तालुक्यातील सासुर्वे गावचे सुपुत्र हवालदार प्रवीण वायदंडे (४०) यांना काल सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास वीरमरण आले. ते अरुणाचल प्रदेश येथील भारत-चीन सीमारेषेजवळ कर्तव्य बजावत होते.

हवालदार वायदंडे हे महार रेजिमेंटच्या २२ इन्फन्ट्री ब्रिगेडमध्ये कार्यरत होते. त्यांच्या निधनाने सासुर्वेसह संपूर्ण कोरेगाव तालुक्यावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी दीक्षा ऊर्फ दीपाली, दोन लहान मुले तेजस आणि प्रज्ज्वल, वृद्ध आई, भाऊ असा परिवार आहे. त्यांचे पार्थिव आज त्यांच्या मूळगावी सासुर्वे येथे पोहोचले. याठिकाणी त्यांच्यावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार झाले. या अंत्यसंस्कारासाठी लष्करी अधिकारी, प्रशासन व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




नवाकाळ

• मुंबई | सोमवार १८ ऑगस्ट, २०२५ • पान -८

# मोदी औंठा-सिमारिया महासेतूचे २२ ऑगस्टला उद्घाटन करणार


**पाटणा-** विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून बिहारमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आणि लोकार्पणाचा धडाका सुरू केला आहे. त्यात आता आणखी एक भर पडली असून, बिहारमधील गंगा नदीवरील औंठा-सिमारिया या ६ पदरी आधुनिक महासेतूचे पंतप्रधान नरेंद्र मोदी २२ ऑगस्टला उद्घाटन करणार आहेत. १,८७१ कोटी रुपये खर्चून बांधलेल्या महासेतूमुळे उत्तर आणि दक्षिण बिहारमधील अंतर कमी होईल. शिवाय ईशान्येकडील राज्यांना जोडण्यासाठी हा एक महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. या महासेतूमुळे उद्योग, व्यापार आणि प्रादेशिक विकासाला एक नवीन दिशा मिळेल. हा महासेतू १.८६५ किमी लांबीचा आहे. दोन्ही बाजूंच्या रस्त्यासह त्याची एकूण लांबी ८.१५० किमी आहे. हा महासेतू उभारायला १० वर्षांचा कालावधी लागला आहे.

गणेश आगमन २०२५


खेतवाडीचा मोरया


धोबीघाटचा राजा


गिरगावचा विघ्नहर्ता


मुंबईचा शुभंकर कामाठीपुरा (सर्व छाया: दीपक साळवी)

# बिग बॉस विजेता एल्विश यादवच्या गुरुग्राममधील घरावर गोळीबार

■ मुंबई

**यूट्यूबर** आणि बिग बॉस ओटीटी २ विजेता एल्विश यादवच्या गुरुग्राम येथील घरावर आज पहाटे अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सकाळी ५.३० वाजताच्या सुमारास तीन दुचाकीस्वारांनी यादवच्या घरावर अंदाजे १२ गोळ्या झाडल्या. गोळ्यांचे निशाण घराच्या तळमजल्यावर आणि



पहिल्या मजल्यावर दिसून आले आहेत. सुदैवाने या हल्ल्यात कोणीही जखमी झाले नाही. गोळीबाराच्या वेळी एल्विश यादव घरी नव्हता, घरात फक्त केअरटेकर उपस्थित होता. घटनेनंतर पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. फॉरेन्सिक तपासणी करण्यात आली असून, सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुरावे ताब्यात घेण्यात आले आहेत.

एल्विश यादवच्या वडिलांनी सांगितले की, गोळीबारापूर्वी आम्हाला कोणतीही धमकी मिळाली नव्हती. तीन हल्लेखोर मास्क घालून आले होते. एक जण दुचाकीवर बसला होता, तर इतर दोघांनी खाली उतरून गोळीबार केला. एल्विश यादव हा अनेक वादांमुळेही चर्चेत राहिला आहे.

# पंजाबच्या ऊपाली गावात एनर्जी ड्रिंक विक्रीवर बंदी

■ अमृतसर

**पंजाबमधील** सगरुर जिल्ह्यातील ऊपाली गावाने एनर्जी ड्रिंकच्या विक्रीवर बंदी घातली. या गावाच्या ग्रामपंचायतीने गावाच्या हिताचे अनेक निर्णय एकमताने घेतले असून, तरुणांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचे सरपंचांनी म्हटले आहे.

ऊपाली गावाचे सरपंच जागीर सिंग यांनी म्हटले की, गावाच्या दहा सदस्यांच्या ग्रामपंचायतीत एकमताने हा निर्णय घेण्यात आला. आमचे सर्व सदस्य ३५ ते ४२ वयोगटातील आहेत. गावातील सर्व दुकानदारांना कोणत्याही प्रकारचे एनर्जी ड्रिंक विकण्यास मनाई करण्याचा निर्णय घेण्यात आला असून जे या नियमाचे उल्लंघन करतील त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्यात येणार आहे. गावातील तरुणांच्या आरोग्यासाठी व त्यांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी कोणीही अंमली पदार्थ विकू नये, कोणत्याही औषधांच्या दुकानांनी डॉक्टरच्या लेखी सूचनेशिवाय सिरींज विकू नये, असेही काही निर्णय घेण्यात आले आहेत.

# अण्णा हजारे आता तरी उठा! पुण्यातील पाषाणमध्ये बॅनरबाजी

■ पुणे

**दहा** वर्षांपूर्वी भारतातील भ्रष्टाचारविरोधी चळवळीचा प्रमुख चेहरा असलेले ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे हे बऱ्याच दिवसांपासून आंदोलनापासून दूर आहेत. यावरून पुण्यातील पाषाण भागात अण्णा हजारे यांना टोला लगावणारे बॅनर लावण्यात आले आहेत. सामाजिक कार्यकर्ते समीर उत्तरकर यांनी ही बॅनरबाजी केली असून, त्यामुळे राजकीय वर्तुळात




चर्चेला उधाण आले आहे.

देशात मतांची चोरी होत असताना, देशात भ्रष्टाचार फोफावला असताना, देशात हुकूमशाही माजलेली असताना, देशाची लोकशाही धोक्यात असताना अण्णा, तुमच्यासारखा ज्येष्ठ गांधीवादी समाजसेवक शांत कसा? अण्णा आता तरी उठा. कुंभकर्णही रावणासाठी गाढ झोपेतून उठला, तसे तुम्ही आपल्या देशासाठी उठा. सरकारविरुद्ध आंदोलन छेडा किंवा प्रश्न विचारा, असे आवाहन पुण्याच्या पाषाण परिसरात लावलेल्या या बॅनरवरून त्यांना करण्यात आले आहे.

# कल्याणमध्ये कचराकुंडीत स्त्री जातीचे अर्भक आढळले

■ कल्याण

**कल्याण** पश्चिमेतील बारावे गाव हद्दीतील शिवमंदिर परिसरातील कचराकुंडी जवळ दोन दिवसांचे स्त्री जातीचे जिवंत अर्भक आढळून आले. खडकपाडा पोलीस ठाण्याला माहिती मिळाल्यानंतर रुक्मिणीबाई रुग्णालय प्रशासनाने हे अर्भक ताब्यात घेतले. सध्या या मुलीची प्रकृती स्थिर आहे. स्थानिकांना कचराकुंडी जवळ कपड्यात गुंडाळलेले अर्भक दिसले. मुलगी जिवंत असल्याचे लक्षात आल्यानंतर पोलिसांना कळविण्यात आले. खडकपाडा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या घटनेची माहिती कल्याण-डोंबिवली पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाला देण्यात आली.

# राज्यात ६ जहाजबांधणी केंद्र! ६,६०० कोटींची गुंतवणूक

■ मुंबई

**सागरी** क्षेत्राला चालना देण्यासाठी सागर किनारपट्टीवर सहा शिपयार्ड क्लस्टर्स (जहाजबांधणी) उभारण्याची महत्त्वाकांक्षी योजना राज्य सरकारने आखली आहे. यातून २०३० पर्यंत ६ हजार ६०० कोटींची गुंतवणूक आणि ४० हजार रोजगारनिर्मिती होणार असल्याचा अंदाज आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (एमएमबी) ही योजना अंमलात आणणार आहे.

एमएमबीचे सीईओ प्रदीप पी. म्हणाले की, सर्वात मोठे शिपयार्ड क्लस्टर नांदगाव (पालघर) येथे असेल. त्याची उभारणी २ हजार ६६६ एकर क्षेत्रावर उभारण्यात येईल. तर दिघी (रायगड) येथे २ हजार ५५० एकर आणि विजयदुर्ग (सिंधुदुर्ग) येथे १ हजार ३७१ एकर जागा लागणार आहे. याठिकाणी पहिल्या टप्प्यात क्लस्टर विकसित करण्यासाठी सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुरू आहे. या तीन ठिकाणांपैकी सर्वाधिक संभाव्य आणि फायदेशीर असलेले ठिकाण सल्लागाराच्या अभ्यासानंतर निवडले जाईल. त्यानंतर प्राथमिक पायाभूत सुविधा विकसित करून खासगी क्षेत्रातील गुंतवणूकदारांना आमंत्रित केले जाईल.

# ज्योती चांदेकर अनंतात विलीन

■ पुणे

**ज्येष्ठ** अभिनेत्री ज्योती चांदेकर यांच्या पार्थिवावर आज पुण्यातील नवी पेठ वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांची कन्या तेजस्विनी पंडित व मनसे अध्यक्ष राज ठाकरे उपस्थित होते. ज्योती चांदेकर यांचे काल निधन झाले होते. त्या ६९ वर्षांच्या होत्या. त्यांनी अनेक मराठी सिनेमा व मालिकांमध्ये भूमिका केल्या होत्या. सध्या त्या 'ठरलं तर मग' या मालिकेत आजीची भूमिका करत होत्या. त्यांच्या निधनाबद्दल मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवरांनी दुःख व्यक्त केले आहे. ज्योती चांदेकर यांची 'मी सिंधूताई सपकाळ' या चित्रपटातील भूमिका विशेष गाजली होती.

# कोल्हापूरकरांची प्रतीक्षा संपली सर्किट बेंचचे मोठ्या थाटात उद्घाटन

■ कोल्हापूर

**कोल्हापूरकरांच्या** तब्बल चाळीस वर्षांपासूनच्या मागणीला आज मूर्त स्वरुप प्राप्त झाले. भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते आज कोल्हापूरच्या सर्किट बेंचचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती, छत्रपती शाहू महाराज आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

उद्घाटनचा जाहीर कार्यक्रम कोल्हापूरच्या मेरी वेदर मैदानावर झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, कोल्हापूर परिसरातील वकील, पक्षकार व सर्वसामान्यांची इच्छा पूर्ण झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस म्हणाले की, सरन्यायाधीश भूषण गवई व मुख्य न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या दृढ निश्चयामुळेच कोल्हापूर येथे सर्किट बेंच होत आहे. कोल्हापूर येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचमध्ये कोल्हापूर, सातारा, सांगली, सिंधूदुर्ग, रत्नागिरी व सोलापूर या सहा जिल्ह्यांतील प्रकरणांची सुनावणी होणार आहे. या सहा जिल्ह्यांमध्ये मिळून सध्या ९० हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. कोल्हापूरच्या भाऊ खिमजी मार्गावरील कोल्हापूर बेंचच्या न्यायालयात उद्यापासून कामकाज सुरू होणार आहे. कोल्हापूरकरांनी आज रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून सरन्यायाधीशांवर पुष्पवृष्टी करत आपला आनंद व्यक्त केला.

# अकोला व अमरावतीत ढगफुटीसदृश पाऊस! जनजीवन विस्कळीत

■ अमरावती

**राज्यात** गेल्या दोन दिवसांपासून पावसाने धुमाकूळ घातला असून अनेक जिल्ह्यांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. अकोला व अमरावती जिल्ह्यांत मुसळधार पाऊस झाल्याने ग्रामीण भागात ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण झाली. सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांत १९ ऑगस्टपर्यंत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

मुंबई, ठाणे व पालघरमध्ये दुसऱ्या दिवशीही पावसाचा जोर कायम राहिला. मुंबईतील तुळशी तलाव ओसंडून वाहू लागला असून ऊर्ध्व वैतरणा, मोडकसागर, तानसा, भातसा, विहार आणि तुळशी तलावांमध्ये ९०.१६ टक्के जलसाठा उपलब्ध झाला आहे.

रायगड जिल्ह्यातील अंबा नदीने धोका पातळी ओलांडली, तर रत्नागिरीत नारंगी नदीला पूर आला. या पुरामुळे खेड-दापोली मार्गावरील वाहतूक ठप्प झाली. गड नदीची पाणीपातळी वाढून दोन



दिवसांत दुसऱ्यांदा माखजन बाजारपेठेत पाणी शिरले. माल दुसरीकडे हलविण्यासाठी बोटी आणण्यात आल्या. जगबुडी नदीनेही खेड शहरात धोक्याची पातळी ओलांडली. दापोली-खेड मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली. चिपळूण शहरातही मुसळधार पावसामुळे रस्त्यावर पाणी साचले.

अमरावती जिल्ह्यात ढगफुटी सदृश पावसाने शेकडो हेक्टर शेतीचे नुकसान झाले. मोर्शी, वरुड, तिवसा भागात शेतात पाणी शिरले. तिवसा तालुक्यातील मोजरी गावाजवळ राष्ट्रीय महामार्ग-६ वरील नवीन बायपासवर भूस्खलन झाले. ज्यामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. मूर्तिजापूर आणि अकोट तहसीलमधील अनेक भागांत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली. अकोला शहरातील मुख्य » पान ७ वर

# बेस्ट पतसंस्थेत २४ कोटींचा भ्रष्टाचार! प्रसाद लाडांचा आरोप

■ मुंबई

**दि** बेस्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी हातमिळवणी केली आहे. उद्या या निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. अशातच ठाकरे बंधूंना पराभव करण्यासाठी भाजपा मैदानात उतरली आहे. आज आमदार प्रसाद लाड यांनी बेस्ट पतसंस्थेचे उमेश सारंग आणि बेस्ट कामगार सेनेचे सुहास सामंत यांनी जवळपास २४ कोटींचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला.



प्रसाद लाड म्हणाले की, बेस्ट सहकारी पतसंस्थेतील भ्रष्टाचार घाग आणि गोरे यांच्या तक्रारीमुळे समोर आला आहे. बंगले खरेदी, कार्यालय खरेदी, डिपॉझिट किकबॅक घेणे यामुळे प्रथमदर्शी २४ कोटीहून अधिकचा भ्रष्टाचार झाल्याचे गुन्हे शाखेच्या निदर्शनास आले आहे. यात सर्व संचालकांची चौकशी होणारच आहे. उमेश सारंग जे पतसंस्थेचे उबाठा सेनेचे अध्यक्ष आहेत आणि बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत यांची देखील चौकशी झाली पाहिजे.

# जम्मू-काश्मीरच्या कठुआत भूस्खलन

■ श्रीनगर

**जम्मू-काश्मीरच्या** कठुआ जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. आज पहाटे अनेक ठिकाणी भूस्खलन झाले. या दुर्घटनेत पाच लहान मुलांसह सात जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये जोध घाटी येथील सुरमु दिन (३२), त्यांची दोन मुले फानू (६) व शेडू (५), झुलफून (१५) आणि ताहू (२) तर बगरा येथील रेणू देवी (३९) व तिची मुलगी राधिका (९) यांचा समावेश आहे. तर सहा जखमींना लष्कराच्या मदतीने रुग्णालयात दाखल केले आहे.

**७ जणांचा मृत्यू**



या दुर्घटनेनंतर प्रशासनाने तत्काळ बचावकार्य सुरू केले. या घटनेच्या पार्श्वभूमीवर वैष्णव देवी यात्रा पूर्णपणे थांबवल्याचा निर्णय प्रशासनाने जारी केला.

मुसळधार पावसामुळे रात्री नदी-नाल्यांचे पाणी वाढले आणि सखल भागांत पूर आला. राजबागमधील जोध घाटी आणि जंगलोटेतील बगरा गावांमध्ये भूस्खलन झाले. याशिवाय चांगडा गाव, दिलवान-हुटली (लखनपूर) भागांतही भूस्खलन झाल्याची माहिती आहे. परंतु या परिसरात मोठे नुकसान झालेले नाही. » पान ७ वर

# इस्लामपूर नामांतरात उरुण शब्दाचा समावेश करावा

**जयंत पाटलांची मागणी**

■ मुंबई

**सांगली** जिल्ह्यातील इस्लामपूर शहराचे नामांतर ईश्वरपूर असे करण्यात आले आहे. मात्र, मूळ ऊरूण इस्लामपूर नावातील उरुण हा शब्द वगळण्यात आल्याने स्थानिकांमध्ये नाराजी आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांनी आज शिष्टमंडळासह राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन येथे भेट घेऊन निवेदन सादर केले. राज्यपालांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेत मुख्यमंत्र्यांना सूचना करण्याचे आश्वासन दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, वाळवा तालुक्यातील उरुण-इस्लामपूर शहराचे नाव ईश्वरपूर करण्याचा प्रस्ताव शासनाने पावसाळी अधिवेशनात मांडला असून, तो केंद्र सरकारकडेही पाठवला आहे. पण, या प्रस्तावात उरुण हा शब्द वगळण्यात आल्याने उरुणचे अस्तित्व धोक्यात येईल. उरुणचा उल्लेख दुसऱ्या शतकापासून आढळतो, तर इस्लामपूरचा उल्लेख सोळाव्या शतकापासून आहे. त्यामुळे शहराची ओळख उरुण-इस्लामपूर अशीच आहे आणि याने सामाजिक सलोखा जपला आहे. त्यासाठी नागरिकांनी १ ऑगस्टपासून साखळी उपोषण सुरू केले असून, अनेक मंत्री उपोषणस्थळी भेट देऊन आश्वासने देऊन गेले आहेत.